# प्रकरण तिसरे

# भारतातील आणि महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळ

# प्रकरण तिसरे

# भारतातील आणि महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळ

**प्रस्तावनाः-**

सर्व मानवी समाजात स्त्रियांचे स्थान हे दुय्यमच मानले गेले. हजारो वर्षांच्या परंपरेने ते तसेच चालू ठेवले. स्त्रियांना दुय्यम स्थान देण्याचे कारण म्हणजे निसर्गाने स्त्रीला दिलेली मातृत्वाची जबाबदारी. ही जबाबदारी पार पाडण्याबरोबरच तिच्याकडे घर, संसार, मुले-बाळे यांची जबाबदारी सोपविली गेली. पुरुषी वर्चस्व प्रस्थापित झाले. परंतु सुरुवातीच्या काळात कुटुंबातील महत्वपूर्ण जबाबदारी स्त्री पार पाडीत असल्याची उदाहरणेही मिळतात. ती म्हणजे समाजव्यवस्थेत अस्तित्वात असलेली स्त्रीप्रधान प्रथा, मातृसत्ताक पध्दती, मातृवंशीय कुटुंबपध्दती. अशा परंपराच्या माध्यमातून स्त्री ची सत्ता होती हे स्पष्ट होतेच. नंतर स्मृती काळात हळूहळू स्त्री सत्तेचे, स्वातंत्र्याचे अधःपतन होत गेले. कृषीप्रधान समाजात स्त्रीला जे स्थान प्राप्त होते ते नंतर राहीले नाही. अपत्य जन्माच्या प्रक्रियेतील आपले महत्व आणि तेथील व्यवसायावरील आपले नियंत्रण याचे महत्व लक्षात आल्यानंतर स्त्रीयांना संरक्षण देणे, तसेच त्यांना आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा प्रयत्न केला असावा. त्यामुळेच मातृसत्ताकतेचे रुपांतर हळूहळू पितृसत्ताक कुटंब पध्दतीत झाले असावे. स्मृती कालामध्ये वर्णव्यवस्था अस्तित्वात आली. हळूहळू जाती व्यवस्था आली. पुरुषप्रधान समाजामध्ये जाती आणि वर्ग निर्माण झाले. नंतरच्या काळात जातीय विषमता टिकवून ठेवण्यासाठी स्त्री हे माध्यम महत्वाचे ठरले. कारण रोटीबेटी व्यवहार हे जातीच्या चौकटीतच केले जावू लागले आणि मग जातीव्यवस्था आणि स्त्रियांचे दुय्यम स्थान यांची सांगड घातली गेली. स्त्रियांचे दुय्यम स्थान ठेवण्याच्या दृष्टीकोनातून तिच्यावर अनेक बंधनाची चौकट लादली गेली.

ब्रिटीशांचे आगमन भारतात होईपर्यंत स्त्रीजीवनाची चौकट ही ठरविलेली होती. धार्मिक, आर्थिक, राजकीय अशा कोणत्याही प्रकारचे अधिकार वा स्वातंत्र्य तिला नव्हते. कुटूंबातही तिला विशेष स्थान किंवा अधिकार देण्यात आलेले नव्हते. पेशवाईचा जेंव्हा शेवट होत आला तेंव्हा ब्रिटीश राजवट स्थिरावू लागले. ब्रिटीशाचे येथे आगमन झाले आणि त्यांच्या बरोबर युरोपातील सद्विचार आणि नवजागृतीचे उदारमतवादी विचारही आले. त्याच बरोबर ब्रिटीशांचा इंग्रजी भाषेतील शिक्षणाचा प्रभाव भारतातील काही नवशिक्षित तरुण वर्गावर झाला. व्यक्तीस्वातंत्र्य , सामाजिक न्याय, समाजातील विषमता याबाबत या वर्गामध्ये नवा दृष्टीकोन निर्माण होवू लागला. समाज सुधारणेची प्रेरणा मिशन-यांमुळे मिळू लागली. आणि सामाजिक सुधारणांबरोबरच स्त्री समाज सुधारणेकडेही या सुधारकांचे लक्ष वेधले गेले. परदेशातील स्त्री सुधारणा चळवळीचे पडसादही उमटू लागले. स्त्री सुधारणा म्हणजे अन्यायाविरुध्द झगडा, न्याय, मानवी हक्काची मागणी, स्वातंत्र्य व समान हक्काची कल्पना याची जाणीव झाली. [1]

**भारतातील स्त्री मुक्ती चळवळः-**

ब्रिटीश राजवट भारतात आली तेव्हा भारतामध्ये विविध प्रदेशात केंद्रशासित सत्ता एकछत्री नव्हती. प्लासीच्या लढाईनंतर ब्रिटीश सत्ताशक्तीच्या रुपात स्थिरावली तेव्हा अनेक प्रांतातील सत्तेमध्ये बदल घडून आले होते. महाष्ट्रामध्ये पेशवाई अस्तित्वात आली होती. बंगालमध्ये मुसलमानी सत्तेच्या अस्ताबरोबर नबांबाचे राज्य उदयाला आले होते. ख्रिस्ती मिशन-यांनी धर्मप्रसार करीत असताना भारतामध्ये असणा-या सती, प्रथा, बालविवाह इ. सारख्या अनिष्ट प्रथा परंपरा या विरोधातही लेखन केले जात होते. याकाळात इंग्रजी शिक्षित मध्यम वर्गीय आणि मिशनरी यांनी इंग्रजी शिक्षणाचे महत्व मानून समर्थन करु लागले. मिशन-यांचा प्रभावही मध्यम वर्गावर पडला होता. सामाजिक स्थिती आणि विषमता याची जाणीव नवशिक्षित वर्गाला होवू लागली. भारतीय स्त्रियांच्या स्थिती विषयीही हा वर्ग विचारमंथन करु लागला. स्त्री शिक्षण, स्त्री-सुधारणा यावर लक्ष केंद्रीत होवू लागले.

बालविवाह सती, विधवा विवाह, पडदा पध्दती अशासारखे प्रश्न उच्चवर्णीय आणि मध्यमवर्गातील स्त्रियांशी निगडीत होते.

एकूणच अव्वल इंग्रजांच्या काळामध्ये ब्रिटीशांच्या इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव पडून भारतातील अभिजन वर्गावर विवेकनिष्ठ, उपयुक्तता आणि उत्क्रांती याचा परिणाम झाला. हा वर्ग सामाजिक सुधारणांकडे झूकू लागला. भारतामध्ये असणा-या प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा यांच्याशी संबंधीत जातीव्यवस्था , पडदा पध्दती , सती, बालविवाह, अनेकेश्वरवाद, मूर्तीपूजा अशा चालींविरुध्द पाऊले उचलण्याची गरज त्यांना जाणवली. या सामाजिक सुधारणेच्या गरजेतून सुधारणा घडवून आणण्याचा या वर्गाचा प्रयत्न सुरु झाला.

ब्रिटिश सत्तेची सुरुवातच बंगालमध्ये झाली असल्याने तेथील मध्यम वर्गीयांच्या प्रगतीला हातभार लागला. त्यानी पाश्चिमात्यांची बौध्दीक प्रगती जाणवून घेतली. 19 व्या शतकातील बुध्दीजीवी वर्गाने स्वतःची ओळख निर्माण केली. गरीब मजूर आणि जमिनदार यांच्या मधल्या पट्टीतील हा वर्ग बनला. या वर्गाच्या वैचारिकतेमुळेच विद्येचे पुनरुज्जीवन , रुढी , अंधश्रध्दा या विरोधात तसेच विज्ञान आणि लोकशाहीला पोषक ठरतील अशा क्रांत्या निर्माण झाल्या.

बुध्दीजीवी वर्ग आपल्या पारंपारिक व्यवथेत बदल घडवून आणीत होता. आधुनिक शिक्षण आणि शहरीकरंणामुळे नवशिक्षित कुटूंबामध्ये देखील असलेले स्त्री-पुरुषामधील कुंपन लक्षात आले. आपल्या मूळ गावी कुंटूबाला सोडून शहरात शिक्षण / कामासाठी पुरुषाला रहावे लागे. त्यामुळे आई - मुलगा त्याचबरोबरच पती - पत्नी यांच्यामध्ये साहचर्य कमी प्रमाणात घडे. तेव्हा पुरुषाचे हे साहचर्य पूर्ण करण्याची कामगिरी शहरातील वेश्यांकडे येई. शहरीकरणाच्या वाढीमुळे शहरीकरणाचे व्यापारीकरण झाले. उच्चवर्णातील अमानुष रुढीला बळी पडलेल्या विधवा स्त्रिया व कुटुंबातील दुर्लक्षित स्त्रिया यांना या व्यवसायाचा जीवनासाठी आधार मिळाला. [2]

अशाप्रकारे कुटुंब आणि समाजाकडून अवहेलना झालेल्या विधवा घटकाला दिली गेलेली वाईट वाग़णूक, पुनर्विवाहासाठी होणारा विरोध, बालविवाह आणि बहुपत्नीत्वाची चाल याविरुध्द त्याकाळातील मध्यमवर्गातील सुधारकांनी वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके याव्दारे आवाज उठविला. ठिकठिकाणी झालेल्या वैचारीक वादविवादांमध्ये स्त्रियांचे प्रश्न हे केंद्रीभूत विषय ठरले. समाज सुधारणा पुरस्कर्त्यांनी कुंटूबाला बळकटी आणली जाईल यावर जोर दिला.

राजा राममोहन रॉय अशा काळातीलच व्यक्ती होती. त्यांच्या विचारामध्ये पाश्चिमात्य तर्कशक्ती आणि भारतीय हिंदू परंपरा या दोहोचेही मिश्रण आढळते. रॉय हे समाजातील अनिष्ट रुढी मोडून काढण्यासाठी झटू लागले. सतीची घातक चाल बंद करण्यासाठी अनेक प्रयत्न व अभ्यास केले. राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथेविरुध्द दोन्ही बाजूंनी हल्ला चढविला. एकीकडे मानवहितवादी व नैसर्गिक जगण्याच्या हक्काच्या दिशेने तर दुसरीकडे हिंदू शास्त्रात सांगितल्याप्रमाणे 1818 साली त्यांनी काढलेल्या पत्रकामध्ये उत्कटपणे हे नमूद केले की, अनुकंपा वा दयेच्या आधारावर आपल्या समाजामध्ये स्त्रियांना हिन व वाईट वागणूक दिली जाते. समाज काय म्हणेल या भितीपोटी स्वतःची विधवा मुलगी सती जाताना शोक व्यक्त करून समाज संस्थेची रुढी मान्य केली जाते. म्हणजेच धर्माचे प्राबल्य अधिक प्रमाणात होते. आणि प्रत्येक धर्ममतानुसार मानव हिताच्या संकल्पना भिन्न असतात. रॉय हे रुढी प्रथांच्या विरोधातच होते. परंपरावादी सुधारक आणि इतर सुधारक दोघेही त्यांच्या मतांना पाठींबा दर्शवितात. स्त्री प्रश्न· समस्यांचा रॉय हे पूर्ण अभ्यास करताना आढळतात. मनू स्त्रियांवर विशेष करुन विधवेबद्दल कशी मते मांडतो हे यांनी सांगितले आहे. मनूबद्दल रॉय लिहीतात —

Manu in plain terms enjoins a widow to continue till death for giving all injuries , performing austerrd duties , avoiding every sexual pleasure and

cheerful practicing the incomparable rules of virtue which have been followed such women as were devoted to only one husband .[3]

रॉय यांना यातून असे सूचीत करण्याचे जाणवते की, स्त्रियांना विधवा झाल्यानंतर मानव म्हणून जगण्याचा हक्कच नाकारला जातो. वेदाचा दाखला देवून ते सती गेल्यास आणि सती न गेल्यास जगावे लागणारे विरक्त जीवन यामधील फरक दर्शवितात.

सनातनी लोक ह सती जाण्याचे महत्त्व मान्य करतात. याच्या मागचे कारण म्हणजे विधवा म्हणून जगताना वैराग्य, विरक्तपणा, तपश्चर्या याला महत्त्व द्यावे लागे. शिवाय विरक्त विधवा राहण्याने अध्यात्मिक किमंत कमी व पूर्ण जीवनभर यातना सहन कराव्या लागतात. सती जाताना मात्र अनेक यातना व त्रास झाला तरी या सर्वातून सुटका होऊन स्वर्गवासी होते असे असावे. ईस्ट इंडीया कंपनीने सुध्दा सतीचे निर्मूलन करण्यासाठी विचार मांडले होते. स्त्रीयांच्या प्रस्नांचे उदात्तीकरणासाठी हळूहळू विचार प्रवाह येत होतेच. या प्रवाहामध्ये असे दोन विचार प्रवाह पुढे आले जे एकमेकांशी संबंधीत परंतु स्वायत्तपणे एकमेकांवर परिणाम करतात ते म्हणजे -

1) सत्तेचे राजकारण, राज्यनियंत्रण, वर्गसंघर्ष, शक्तीचे एकत्रीकरण इ.

2) भाषण चर्चा, वाक्यप्रचार इ.

स्त्री प्रश्नामधे सतीवादामध्ये धर्मग्रंथ व त्यांचे संदर्भ हे महत्वपूर्ण भूमिका बजावतात. धर्मग्रंथाव्दारे पूर्णपणे धार्मिकतेवरुन इतिहास व राजकारण्याच्या संदर्भामध्ये सतीचे विश्लेषण करता येते. तसेच परंपरेचे प्रतिक म्हणजे स्त्री त्यामुळे परंपरेच्या पुनर्लिखाणामध्ये स्त्रीचे हक्क, कर्तव्ये याबाबी महत्वाच्या ठरल्या. [4]

या सर्व बाबींमध्ये रॉय यांचे प्रयत्न महत्वपूर्ण होते. रॉय हे सती विरोधी मोहिमेचे भारतातील पहिले सुधारक म्हणून गणले जातात. तरीही 18 व्या शतकाच्या दरम्यान ब्रिटीश आणि अमेरिकन मिशन-यांनी या मोहिमेकडे लक्ष दिले होते. सामाजिक अनिष्ट रुढी नष्ट केल्या पाहीजेत असा प्रयत्न मिशन-यांचा आढळतो. परंतु ब्रिटीश शासनाने सतीच्या विरोधात

कायदा केल्यास हिंदूच्या धार्मिक क्षेत्रात आपला हस्तक्षेप होईल यासाठी असा कायदा करण्यास नकार दिला. मात्र 19 व्या शतकाच्या सुरुवातीला ब्रिटीश शासनाला तडजोड म्हणून कराव्या लागणा-या बाबीमध्ये सतीविषयी प्रथम सक्तीने व स्वखुषीने सती जाणे याबद्दल फ़रक करणारा कायदा संमत करावा लागला. यापूर्वी अनेक शतके मधील कालखंडातही असा कायदा संमत करण्याचा प्रयत्न झालेला होता. [5] मृत्यूंजय विद्यालंकार या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख पंडीतानी 1817 मध्ये सती जाण्यास धर्मशास्त्राची मंजूरी नाही असे जाहीर केले. बंगालचे प्रांतीय राज्यपाल विल्यम बेंटिक यांनीही 1818 मध्ये त्यांच्या प्रांतात सतीवर बंदी घातली. बेंटिकने जरी सतीबंदीचा कायदा प्रांतात लागू केला तरी दिवसाला एकापेक्षा अधिक सती जाण्याच्या घटना या प्रांतात घडलेल्या आढळतात. परकिय शासनकर्ते सतीबंदीचा कायदा करतील की नाही याबाबत रॉय यांना शंका वाटत होती. जेव्हा बेंटिक भारताचे गव्हर्नर जनरल झाले तेव्हा 1829 मध्ये सतीवर बंदी घालणारा कायदा मंजूर झाला. [6]

अशा प्रकारे स्त्रियांच्या स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी सतीबंदीच्या माध्यमातून स्त्री चळवळीला पश्चिम बंगालमधून खरी सुरुवात झालेली आढळते. हळूहळू स्त्री प्रश्न हाताळून सुधारणा घडवून आणण्याचा सुधारकांचा प्रयत्न सुरु झाला. शिक्षणाचा प्रश्नही महत्वाचा होता. स्त्रियांच्या शिक्षणासाठीही मिशन-याकडून प्रयत्न होवू लागले. 1810 मध्ये इंग्रजी व अमेरिकन मिशन-यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. 1819 मध्ये कलकत्त्यात फ़िमेल न्यू वे नाईल सोसायटीने शिक्षणावरील भारतीय भाषेतील पहिले ( बंगाली ) पुस्तक प्रकाशीत केले. हुगळी तालुक्यात मुलींसाठी मिशन-याकडून 12 शाळा सुरु केल्या गेल्या. वर्षभरानंतर लेडीज सोसायटीने कलकत्ता आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये स्थानिक स्त्रियांच्या शिक्षणासाठी शाळा उघडल्या. त्या चालविण्याचे कार्य कुमारी कुक यांनी केले. यापैकी काही भागातील शाळांमध्ये गरीब वस्तीतील मुसलमान स्त्रिया उत्साही असलेल्या आढळल्या गेल्या. 19 व्या शतकाच्या मध्यावर बंगाल, तसेच मुख्यत्वेकरुन कलकत्त्यामध्ये

स्त्रीशिक्षण ही महत्त्वाची बाब मानली गेली. जहाल विचाराचे विद्यार्थी आणि ब्राम्हो ( पुरोगामी हिंदू ) यांनी स्त्री शिक्षणाची मोहीम सुरु केली.

मिशन-यांनी सुरु केलेल्या शाळामध्ये गरीब कुटूंबातील मुली अधिक प्रमाणात होत्या. तर नवीन शाळांमध्ये उच्च जातीच्या मुली जात होत्या. प्रौढ स्त्रियांसाठी सुध्दा शिक्षणाची दारे खुली व्हावीत यासाठी मिशन-यांनी शिक्षण सुधारणा मोहीम राबविली. ही मोहीम 'घरोघरी जावून शिक्षण' या नांवाने ऒळखली गेली. पुढे नंतरच्या काही कालावधीतच ब्राम्होनी मिशन-यांशी या स्त्री शिक्षण कार्यासाठी हातमिळवणी केली. [7] अशाप्रकारे स्त्री शिक्षण सुधारणा चळवळीची हळूहळू पं. बंगालमधून सुरुवात झाली.

स्त्री प्रश्नातील अतिशय कळीचा असलेला व 19 व्या शतकात अतिशय गहन बनलेला प्रश्न म्हणजे विधवा पुनर्विवाह. अगदीच लहान वयात लग्न केले जात असल्याने मुलींना लहान वयात बालविधवा सारख्या समस्यांना सामोरे जावे लागे. समाजातील सुधारणा चळवळीचे कार्य करणा-या स्त्री सुधारकांचे या प्रश्नाकडेही लक्ष वेधले गेले. विधवा स्त्रीच्या हीन जीवनाचे समाजात सर्वत्र दर्शन होत होते. 1850 च्या दशकापर्यंत समाज सुधारणा चळवळीला प्रारंभ झालेलाच होता. त्याचबरोबर पुराणमतवादी विचारांच्या हिंदूंची प्रतिक्रिया ही तितकीच तीव्र बनलेली होती. सुधारणा चळवळीना ब्रिटिशांचा पाठिंबा होता. या दशकात विधवा पुनर्विवाहावरील प्रश्नांची गांभीर्याने दखल घेतली ती इश्वरचंद्र विद्यासागरांनी. त्यांनी प्रथम बंगाली भाषेमधून एक पुस्तिका लिहीली. त्यामध्ये शास्त्रांनी विधवा पुनर्विवाहाला दिलेली मान्यता दाखवून दिली. या पुस्तकाचे त्यांनी इंग्रजी भांषातर करुन ब्रिटीश अधिका-यासमोर त्यांच्या प्रती सादर केल्या. त्यांनी 1855 मध्ये विधवा पुनर्विवाह कायद संमत व्हावा यासाठी राज्यपालांना विनंतीपत्र सादर केले. यामध्ये त्यांनी असे म्हटले की, काही हिंदू परंपरामध्ये असलेला विधवा पुनर्विवाह हा ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटीश सरकारतर्फे चालविल्या जाणा-या न्यायालयाने बेकायदेशीर ठरविला. त्यामुळे ते आता पुनर्विवाह करीत नाहीत. या बंदीचा परिणाम म्हणजेच अनैतिकता वाढीस लागते. ग्रांट यांनी विद्यासागर यांच्या विनंती पत्राच्या

आधारे विधीमंडळात कच्चे बिल सादर केले.[8] या बिलाला हिंदू सनातन्यांनी विरोध दर्शविला. विधवा पुनर्विवाहामागची भूमिका म्हणजे विधवा स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तरुण विधवांना नाईलाजाने दुर्गुणांकडे वळावे लागते. ब-याच वेळा व्यभिचारी आणि भटके जीवन जगावे लागते. कलंकीत आयुष्याला सामोरे जावे लागते. वासनेची शिकार बनलेल्या अगर पाऊल वाकडे पडलेल्या अनेक विधवा स्त्रियांना वेश्या व्यवसाय स्विकारण्याशिवाय पर्याय रहात नाही. समाजातील नैतिक अधःपतन नकळत घडते. भ्रूणहत्या, गर्भपात करावे लागते. या स्त्रिया वाममार्गाला लागतात. या सर्व बाबीचे मूळ कारण विधवा पुनर्विवाहावरील बंदीचे ठरते. त्यामुळे ही बंदी उठविण्यासाठीच विधवा पुनर्विवाह सुरु होण्यासाठी विद्यासागर यांनी ब्रिटीश शासनाला विनंतीपत्र सादर केले. परंतु उच्चवर्गीय हिंदूनी बीलाच्या विरोधातही विनंतीपत्रे सादर केली.

1856 मध्ये जरी हे बिल पास झाले तरी यामुळे पुनर्विवाह मोठ्या प्रमाणात घडून आले असे नाही. 1890 पर्यंत म्हणजेच 40 वर्षात फ़क्त 500 विधवा पुनर्विवाह झाले. यावरुन जाणवते की, हे बील पास झाले तरी ते अंमलात आणणे सुधारकांनाही कठीणच गेले असावे. समाज सुधारणा संस्थानी केलेले प्रयत्नही या ठिकाणी अपुरेच पडलेले आढळतात. हे झालेले विवाह अधिकतम बाल विधवा किंवा कुमारी विधवांचे होते. ज्या विधवा उच्चजातीय होत्या परंतु कुमारी नव्हत्या त्यांनी पुनर्विवाह केला नाही. व त्यांना ते शक्यही नव्हते.[9] हा कायदा पास झाला व हिंदू विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार मिळाला तरी या कायद्याचा परिणाम आदिवासी जमातीत आणि काही जातीमध्ये झाला व त्यांना पुनर्विवाह करणे कठीण झाले . कारण या कायद्याने आपल्या पोट कलमात भर टाकली. ती म्हणजे पुनर्विवाह करणा-या विधवेला आपल्या पूर्वीच्या नव-याकडून मिळालेल्या संपत्तीच्या किंवा वारसा हक्काने येणा-या संपत्तीवर मात्र पुनर्विवाहानंतरही हक्क राहणार होता. परंतु पहिल्या नव-याकडच्या संपत्तीसाठी तिला खास परवानगी घ्यावी लागणार होती. एकूणच या कायद्याचे

सार म्हणजे पुनर्विवाहाचे वेळी तिला पोटगी, वारसा हक्क, संपत्तीचा हक्क, या सगळ्याना मुकावे लागले. अशा प्रकारच्या तरतूदीनुसार विधवा पुनर्विवाहाचा कायदा अस्तित्वात आला.

दयानंद सरस्वती आणि त्यांच्या अनुयायांनीही सामाजिक सुधारणेचे कार्य हाती घेतलेले होते. आर्यांच्या प्राचीन भारतामध्ये बालविवाह, बहुपत्नीकत्व, स्त्रियांना एकटे पाडणे यागोष्टी अस्तित्वात नव्हत्या. स्त्री - पुरुष यांना समान हक्क प्राप्त होते. वैदिक भारतात विधवा स्त्री पुरुष यांच्यामध्ये समानता होती. अशा गोष्टीवर सरस्वतींनी जोर दिला. म्हणजेच स्त्री - पुरुष यांच्यामध्ये पूर्वीपासून समानता होती . परंतु मधल्या काळात त्यावर निर्बंध घालून स्त्रियांचे हक्क, समानता मर्यादित केली गेली. हेच त्यांना अभिप्रेत असल्याचे जाणवते. स्त्री शिक्षणा बाबतीतही आपल्या मताशी ठाम राहून ते म्हणतात. मुला मुलींनी 5 व्या वर्षापासून हिंदी, संस्कृत व इतर भाषांच्या अभ्यासास सुरुवात करावी. मुलींना मुलांप्रमाणेच जानवे घालण्याची व सुरुवातीचा यज्ञपिठाचा विधी करण्याची मान्यता होती. मुलींनी व मुलांनी वेगवेगळ्या शाळेत शिक्षण घेणे आवश्यकच आहे. तो धर्मातील एक भाग आहे. त्यांनी काही वर्षे ब्रम्हचर्य व्रताचे पालन केले पाहीजे. तसेच त्यांचे विवाह वय मुलीचे कमीत कमी 16 व मुलांसाठी 25 असले पाहीजे अशाप्रकारचे विचार मांडत त्यांनी स्त्रीशिक्षणाच्या माध्यमातून स्त्री पुरुष समानता या तत्वाचा पुरस्कार तसेच बाल विवाहाला विरोध दर्शविल्याचे जाणवते. [10]

बंगाल मधून सामाजिक सुधारणांच्या माध्यमातून स्त्री सुधारणा चळवळीला प्रारंभ झाला तरी त्याचे पदसाद इतर राज्यामध्येही उमटले व या चळवळीला सर्वकडे कमी अधिक प्रमाणात सुरुवात झाली.

आसाममध्ये बंगालमधील सुधारणांचा ठळक प्रभाव पडला नसला तरी काही बुध्दीवादी व्यक्ती त्याकडे आकर्षिले गेले. गुणाभीराम बरुआ या व्यक्तीच्या दोन नाटकामध्ये विधवा आणि पुनर्विवाहाची इच्छा हे विषय मांडले आहेत. शिवाय गुणाभीराम यांनी स्वतः विधवेशी विवाह करुन समाजापुढे आदर्श ठेवला. पुढे हेमचंद बरुआ या व्यक्तीनेही विधवा पुनर्विवाहाला

पाठिंबा दिला. गुणभीराम बरुआ यांनी आपल्या रामनवमी या नाटकातून ईश्वरचंद्र विद्यासागर हे विधवा पुनर्विवाहासंबंधी भाषण देत आहेत. असा देखावा निर्माण केला. [11]

ओरिसा समाजसंघटनेमध्ये ब्राम्हणाचे वर्चस्व होते. समाजात बालविवाह, स्त्री गुलामी अशा वाईट चाली सुरुच होत्या. 19 व्या 20 व्या शतकात ओरिसामधे आलेल्या अनेक सामाजिक चळवळीपैकी स्त्रियांच्या प्रश्नांबाबत झालेल्या चळवळी महत्वपूर्ण आहेत. येथील स्त्रिया पूर्वीच्या मुस्लीम आणि मराठा काळापासून गुलामगिरीच्या स्थितीत राहील्या होत्या. नंतरच्या काळात त्यामध्ये फ़रक पडत गेला. ब्रिटीशांनी प्रशासनाच्या सुरुवातीपासूनच स्त्रियांना चांगले आणि योग्य सामाजिक जीवन देण्याचा प्रयत्न केला. कारण ब्रिटीशानी निरीक्षण केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, ओरिसातील संपूर्ण सामाजिक एकजिनसीपणा व्यवस्थित ठेवण्यासाठी स्त्रियांना काही प्रमाणात स्वातंत्र्य दिले पाहिजे. म्हणजेच ऑरिसातील स्त्री सुधारणा चळवळीत ब्रिटीशांचा हातभार लागला असेच म्हणावे लागेल. [12] ऑरिसातील ( कटक ) ब्राम्हो समाजाचा इतिहास 1855 पासूनच सुरु होतो. बालविवाहास बंदी, विधवा पुनर्विवाह, मुलांसाठी शाळेची स्थापना इ. कडे ब्राम्हो समाजातील कार्यकर्त्यांनी ओरिया लोकांचे लक्ष वेधले. त्यामुळे शिक्षीत समाज समाजजागृतीची जाणीव करुन देण्याकडे ओढला गेला. त्यामुळे हळूहळू समाज जागृतीचे प्रयत्न तेथे सुरु झाले. [13]

तामिळनाडू येथेही 1860 नंतर समाज सुधारणेचे प्रयत्न सुरु झाले. विरेसलिंगम पंथलू यांनी प्रामाणिकपणे सुधारणा कार्य हाती घेतले. स्त्रियांच्या गुलामगिरी विरुध्दही त्यांनी कार्य केले. त्यांनी 1881 मध्ये विधवा पुनर्विवाह संस्था आणि विधवा गृह यांची राजामुद्री येथे स्थापना केली. या विधवा गृहातच शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. व स्त्रियांसाठी शिक्षणाची सोय केली. 1887 साली राजा सर टी माधवराव यांच्या अध्यक्षतेखाली इंडीयन नॅशनल सोशल कॉन्फ़रन्सची बैठक झाली. 1892 साली हिंदूमध्ये समाजजागृती करण्यासाठी, स्त्रीशिक्षण, विवाह वयात बदल, विधवा पुनर्विवाह जातीपातीचे नियम शिथील

करणे इ. कारणांसाठी सुधारणा करण्याच्या दृष्टीने मद्रास हिंदू सोशल रिफ़ॉर्म असोसिएशनची स्थापना करण्यात आली. [14]

आंध्रमधील सामाजिक व धार्मिक चळवळीचे खरे प्रणेते कांडूकरी विरेशलिंगम पंथलू हे होते. विरेशलिंगमनी प्रार्थना समाजामार्फ़त प्रत्येक आठवड्याला वेगवेगळे कार्यक्रम घेतले. 1897 ला मद्रास मध्ये एक तीन मजली घर खरेदी करुन त्यांनी चिंतामणी प्रिंटींग प्रेस सुरु केले. त्याच ठिकाणी विधवा गृहही सुरु केले. [15] थिऑसॉफ़ी सोसायटीच्या मार्फ़तही सहशिक्षण , स्त्री उध्दाराचे कार्य पार पडले गेले. धार्मिक समाजसुधारणेचा आंध्रमधील झालेला परिणाम म्हणजे सार्वजनिक जीवनात स्त्रियांमध्ये भाग घेण्याचे धैर्य निर्माण करण्यात आले. समकालीन भारतातील सुधारणा चळवळीपेक्षा आंध्रमधील सामाजिक सुधारणा चळवळीना यश प्राप्त झाल्याचे आढळते.

उत्तर भारतातून सुधारणा ओघानेच कर्नाटककडे येत होत्या. ब्राम्होसमाज, आर्यसमाज, थिऑसॉफ़िकल सोसायटी, रामकृष्ण मिशन या सर्व संस्थाचे कार्य कर्नाटकात सुरु झाले. ब्राम्हो समाजाने
बेंगलोरमध्ये शाखा काढून विधवा विवाह घटस्फ़ोट, स्त्रियांचे शिक्षण या प्रकारच्या स्त्री समाज सुधारणेच्या कार्याला सुरुवात केली.

### महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळ:-

ब्रिटीश राजवटीचे भारतात आगमन होण्यापूर्वी येथील स्त्रियांचे जीवन हे मर्यादीतच होते. स्त्री - पुरुष यांच्या कामाची क्षेत्रे ठरलेली होती. स्त्रीला धार्मिक, आर्थिक, सामाजिक अशा कोणत्याच क्षेत्रात स्वातंत्र्य नव्हते. घरापुरतेच, कुटूंबापुरतेच तिचे क्षेत्र होते. मात्र ठराविक मर्यादेपर्यंतच तिचा कुंटुबातील अधिकार होता. पेशवाईचा शेवट होवून ब्रिटीश राजवट महाराष्ट्रात स्थिरस्थावर झाली. ब्रिटीशांच्या आगमनाने मुळातच संपूर्ण भारतामध्ये युरोपियन संस्कृती तेथील नवीन विचार इंग्रजी भाषा, व्यक्ती स्वातंत्र्यवाद, बुध्दीप्रामाण्य,

सामाजिक न्याय - अन्याय इ. नवविचारांचा प्रभाव तरुण पिढीवर होवू लागला. या नव्या जाणिवांनी समाजसुधारणांचे विचार रुजले. या समाज सुधारणेतूनच स्त्री समाज सुधारंणेची प्रेरणा निर्माण झाली. 1850 - 70 पर्यंत स्त्री सुधारणाचे म्हणावे इतके वारे महाराष्ट्रात नव्हते. हळूहळू स्त्री - शिक्षण, स्त्री दास्य यावर विचार होवू लागला. स्त्री संस्था निघू लागल्या. परदेशातील स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीचे लोण येवून पोहोचले. स्त्री स्वातंत्र्य, समान हक्क या कल्पना निर्माण होवू लागल्या. या सर्व पार्श्वभूमीवर 1850 - 1920 पर्यंतचा कालखंड स्त्री सुधारणा चळवळीच्या दृष्टीकोनातून अभ्यासण्यासारखा आहे. कारण या वेळच्या महत्वपूर्ण ठरलेल्या स्त्रियांची वडीलधारी पिढी स्त्रीसुधारणा घडवून आंणणा-या, पूर्णपणे प्रागतिक दृष्टीकोन असणा-या समाज सुधारकांबरोबर होते. महाराष्ट्रातील समाज सुधारणातून स्त्री समाज सुधारणेचा प्रयत्न भारतातील इतर राज्यांच्या मानाने अधिक झाल्याचे जाणवते. महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा अभ्यास त्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरतो.

भारतामध्ये अनेक ठिकाणी चालू असलेल्या प्रथा, परंपरा, महाराष्ट्रामध्येही सुरु होत्या. त्याचा प्रभावही स्त्री वर्गावर पडलेला आढळतो. स्त्रियाही त्यांचे पालन सक्तीने नसले तरी कर्तव्य म्हणून करीत होत्या. त्यातील काही रुढी, प्रथांची माहिती खालील प्रमाणे :-

## रुढ़ी , प्रथा व स्त्री प्रश्न - समस्या

**सतीची चाल** :-

सतीची परंपरा अनेक शतकापासून भारतात सुरु असलेले उल्लेख आपण पूर्वी अभ्यासले आहेच. महाराष्ट्रातही काही प्रमाणात सती जाण्याची पध्दत उच्च घराण्यात रुढ असलेली दिसते. सतीच्या पध्दतीची अंमलबजावणी रितीरिवाजाचा भाग म्हणून मराठ्यांच्या सत्ता काळात पाळले जात होते. परंतु बंगाल इतकी सतीची भीषण स्थिती महाराष्ट्रात पसरली नव्हती. माधवराव पेशव्यांची विधवा पत्नी रमाबाई, गोविंदहरी पटवर्धनानांची पत्नी सत्यभामाबाई , बळवंतराव मेहेंदळे, बाबूराव फ़डणीस, जानोजी निबांळकर यांच्या बायकांनी

पतीच्या मृत्यूनंतर विधवा म्हणून उपेक्षीत जीवन व्यतीत करण्यापेक्षा व मृतवत जगण्यापेक्षा सती जावून मरण पत्करलेल्या दिसून येतात. पेशव्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या प्रदेशात 1812 च्या काळात सती गेल्याची 12 च्या आसपास उदाहरणे नमूद केलेली आहेत. याच दरम्यान कलकत्ता आणि त्या परिसरातील प्रदेशात 1815, 1816, व 1817 साली अनुक्रमे 253 , 289, व 441 इतकी सती गेल्याची नोंद होती. [16] त्यामानाने महाराष्ट्रात ही चाल नगण्य स्वरुपात होती असे मानावे लागेल. पं. बंगाल मधील सती जाण्याची ब-याच वेळा सक्ती होत असे. त्यामागचे कारण विधवा पत्नीला मिळणारा वारसा हक्क व संपत्ती यापासून दूर करणे हा उद्देश असावा. महाराष्ट्रात या उद्देशाचे प्रमाण कमी व धार्मिक भाव अधिक असावा असे जाणवते. 1827 मध्ये करण्यात आलेल्या सतीबंदी कायद्याचे पडसाद काही प्रमाणात का होईना महाराष्ट्रातही उमटले.

**बहुपत्नीत्वाची रुढी व गुलाम स्त्री** :-

मराठा काळात उच्च घराण्यामध्ये बहुपत्नीत्वाची चाल अस्तित्वात होती. एकापेक्षा अधिक सहा,

आठ अशा पत्नी असत. राजा शिवछत्रपतीना आठ, नाना फ़डणीसाना नऊ, पेशवा दुसरा बाजीराव याला तर अकरा लग्नाच्या बायका होत्या. [17] सामान्य जनतेत मात्र बहुपत्नीत्वाची चाल कमी असली तरी व्दिभार्या असलेल्या दिसतात.. पेशवे कालखंडात खुल्या बाजातात स्त्रियांची खरेदी - विक्री रुढ होती. स्त्री गुलामांना बटकी किंवा कुणबीनी असे संबोधले जात होते. या स्त्री गुलामांचा उपयोग घरकामे करुन घेण्यासाठी केला जाई. शिवाय काहीनां नाच - गाने शिकवून मनोरंजनासाठी या स्त्रियाचा वापर केला जात होता. अशा प्रकारची वाईट स्थिती स्त्री गुलामांची होती.

**केशवपन :-**

विधवांचे केशवपन करण्याची प्रथा भारतात अनेक ठिकाणी असली तरी ती उत्तर भारत आणि केरळ मध्ये ती अनोळखी आहे. असे मानले जाते कि केशवपनाची प्रथा 15 व्या शतकात उदयास आली. दख्खनमध्ये बौध्द धर्मात ही प्रथा अवशेष रुपात अस्तित्वात होती. ' अश्वलायन व शौनक स्मृती' मते विधवेने तिचा मुलगा जर अंतिम विधी करणारा असेल तर नवरा मेल्यानंतर 10 व्या दिवशी तिने केशवपन केले पाहिजे . 'स्कंध ' पुराणामध्ये निर्णयसिंधूच्या ग्रंथकर्त्यांनी सांगितले आहे कि विधवेने नेहमी केशवपन केले पाहिजे . कारण तिच्या केस बांधण्याने तिचा नवरा दुसऱ्या जगामध्ये दुखा:त बांधला अगर गुरफटला जातो. [18]

**बाल जरठ विवाह :-**

लहान मुलीचा विवाह प्रौढ पुरुषाशी म्हणजे बाल जरठ होय . 12-14 वर्षाच्या मुलीचा विवाह चाळीशीच्या पुढ़ील वयाच्या प्रौढाशी लावून देणे ही बाब समाजात सर्वसामान्य मानली जात होती. लहान वयात लैंगिक अत्याचाराला मुलींना बळी पडावे लागत होते . या प्रकारच्या विवाहामुळे लहान वयात मुलींना विधवापण सोसावे लागत होते. आजारपणामुळे वयस्कर पतीचा मृत्यू लवकर होत असे . तर तरुणींना विधवा म्हणून समाजासमोर वावरावे लागत होते. समाजातील वाईट वृतीच्या वासनेला त्यांना बळी पडावे लागत होते . तरुणपणात कित्येक विधवांचे पाऊल वाकडे पडत . अशी स्थिती समाजामध्ये निर्माण होऊन स्त्रियांनाच या समस्यांना सामोरे जावे लागलेले आढळते.

**वैधव्य :-**

पुर्वीच्या काळात बालविवाह सहजपणे होत होते. याचा परिणाम कमी वयातच मुलीला अकाली विधवापण स्विकारावे लागत असे . विधवा स्त्रीला जाचक बंधनात अडकवले जात होते . त्यांना सक्तीने सती जाण्यास भाग पाडले जात होते . ज्या विधवा सती जात नसत त्यांना दैनंदिन जीवनात रोज मरणयातना सहन कराव्या लागत होत्या. कोणत्याही धार्मिक कार्यात सहभागी होणे वर्ज्य , विधवेचे दर्शन होणे पाप. ' एकाच जागी अंधाऱ्या खोलीत

तासनतास बसावे लागे, पुरेसे अन्न मिळत नसे अशी स्थिती होती . शिवाय विधवेला केशवपन सारख्या अमानुष रुढीलाही सामोरे जावे लागत असे.

19 व्या शतकातील स्त्रियांच्या परिस्थितीकडे पाहिल्यास ती फारशी समाधानकारक वाटत नाही. कन्या जन्माला आली म्हणजे तिची हत्या करण्याचाही प्रयत्न केला जात होता. ही चाल मराठी समाजात रुढ नसली तरी भाऊ दाजीप्रमाणे लोकहितवादिंनी याची दखल घेतलेचे आढळते . त्यांनी कन्या हत्या , लग्नाविषयी विचार , इंग्रजी राज्यापासून लाभ इ.निबंधातून मुलींना मारण्याच्या चालीवर टिका केलेली आढळते. [19] कन्या विक्रय करण्याचा प्रयत्नही त्या काळात अस्तित्वात असलेला आढळतो. 'पुणे शहाराचे वर्णन ' या पुस्तकात 1824 सालचे गहाणखतामध्ये मुलगी गहाण ठेवल्याचे आढळते. 1 सप्टेबर 1847 च्या ज्ञानोदयाच्या मजकूरातही लोभनिष्ठ आईबाप रुपये घेऊन जो नवरा मिळेल त्यास मुली देतात . मुलीचे खरे कल्याण न पहाता कोकणातून आलेल्या मुली सावकाराकडे कर्जफेडीसाठी ठेवल्या जातात. या गुन्हयासाठी शिक्षा व्हावी असे ' ज्ञानोदय कर्ते 'सुचवितात .

स्त्री सुधारणा चळवळीमध्ये ' दर्पण ' या वृतपत्राने वेश्या व्यवसायाची गंभीर दखल घेतलेली आढळते . दर्पणच्या अंकात हिंदूस्थानातील नाच - तमाशाला गुलामगिरीचा प्रकार म्हटलेले होते . गरीब दु:खी लोकांचा फायदा घेऊन, पैशाचा मोह दाखवून कसबिनींच्या मंडळ्या मुलींना विकत घेत व वेश्या व्यवसायासाठी त्यांना तयार करत . समाजातील श्रीमंत प्रतिष्ठीत लोक उघडपणे रखेल ठेवीत. 1868 मध्ये इंग्लंडमध्ये असणारा या संदर्भातील कायदा हिंदूस्थानात आला. या कायद्यानुसार वेश्याची नोंद करणे , सक्तीने त्यांची शरिरिक तपासणी करणे , रोगग्रस्त वेश्यांना सक्तीने औषधोपचार करणे या गोष्टींना सुरुवात झाली. 1870 पासून हा कायदा मुबंईत सुरु झाला . उपचारासाठी तात्पुरते रुग्णालय सुरु झाले. पहिल्या वर्षी 2000 वेश्यांची नोंद व डॉक्टरी तपासणी झाली . औषधोपचारासाठी रु. 80000/- खर्च ज़ाले परंतू या कायद्याला वेश्यांचा व मुंबईचे बिशप आणि इतर प्रतिष्टित लोकांचा विरोध होता . शेवटी 1888 मध्ये सक्तीची नोंद व डॉक्टरी तपासणीचा कायदा

बदलण्यातआला.सातत्याने पडणारे दुष्काळ व विधवा विवाहाला असणारी बंदी यामुळे वेश्या व्यवसायाकडे अनेक अनाथ , बेसहारा स्त्रिया वळत असत. यात ब्राम्हण विधवांची संख्या अधिक आढळते.

विविध लिखाणातूनही स्त्री प्रश्न हाताळणेचा प्रयत्न झालेला आढळतो . 8 जून 1832 च्या 'दर्पण ' च्या अंकात ' माताचे पत्र ' प्रसिध्द झालेले आढळते . त्यामध्ये दासी म्हणून स्त्रीला मिळणारी वागणूक व त्याबद्दलची खंत व्यक्त केलेली आढळते . लक्ष्मीबाई टिळाकांच्या स्मृतीचरित्रात पत्नीला दासी वा जनावरापेक्षाही वाईट वागणूक दिल्याचे उल्लेख आहेत. लक्ष्मीबाई याबाबत म्हणतात की ,त्याची सासू अत्यंत प्रेमळ व सोशिक होती. सासरे तितकेच संतापी व अहंकारी होते . एकदा सासूने आपल्या डोक्यावरचा पाण्याने भरलेला हंडा खाली उतरविण्यासाठी मदत करण्याचे सुचवितातच सास-याने ' मी काही तुमचा चाकर नाही ' असे म्हणून सासूला एवढ्या जोराने लाथ मारुन खाली पाडले की त्यातचा सासुचा मृत्यू झाला .

1882 मध्ये ताराबाई शिंदेनी ' स्त्री- पुरुष तुलना ' पुस्तक लिहून कुटुंबात , समाजात स्त्रीला मिळणाऱ्या वागणुकीचा उल्लेख करतात , त्या म्हणतात , " त्यांना (स्त्रियांना ) निरंतर बंदीवानासारखे गृह तुरंगात कैदी करुन ठेवले व जिथे तिथे आपली चढती कमान करून राव बनलेत...... लहानापासून आपले हाती सारी शिक्का अधीन ठेवून स्त्री - जातीला अगदी अंधार कोठडीत या जगापासून दूर पडद्यात , जरबेत निरंतर बटकीसारखी ताबेदारीत ठेवून जिथे तिथे तुम्ही आपल्याच गुणांचे दिवे पाजळलेत. " अशा प्रकारचे विश्लेषण ताराबाई शिंदेंच्या लिखाणात आढळते. [20]

त्या काळात गाजलेले प्रकरण म्हणजे रखमाबाई -दादाजी खटला हा स्त्री सुधारणेच्या दृष्टीने महत्वपुर्ण ठरतो . रखमाबाईने आपल्याला आवडत नसलेल्या नवऱ्याकडे जाण्याचे नाकारून हिंदू धर्मशास्त्र रुढी व पुरुषांना एक प्रकारचे आव्हान दिलेले आढळते . रखमाबाईनी नवऱ्याला सोडले , त्याबद्दल सुनावण्यात आलेल्या शिक्षेलाही समोरी गेली. नकळत्या वयात झालेला विवाह अमान्य केला. अडाणी , जेमतेम शिकलेला , शिक्षणाबद्दल अनास्था असलेला

, नव्या जागाला नाकारणाऱ्या दादाजीला रखमाबाईने नाकारले . यावरुन बाल विवाहाचाच परिणाम रखमाबाईनी दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो . अशाप्रकारे हळूहळू 19 व्या शतकात स्त्री प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न झालेला दिसतो . व हळूहळू यातूनच स्त्री सुधारणा चळवळी उदयास येत होत्या. [21]

महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा चळवळीमार्फत सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात सुधारकांनी प्रयत्न केले. लोकहितवादी , बाळशास्त्री जांभेकर , विष्णू शास्त्री पंडीत यानी विधवा पुनर्विवाहविषयी अनुकूल वातावरण निर्मिती प्रयत्न केला. 'दर्पण' , व 'प्रभाकर ' मधून बाळशास्त्री जांभेकरांनी विधवा पुनर्विवाहवरील लेख प्रसिद्ध केले. 'इंदूप्रकाश ' मधून लेखन करुन विष्णूशास्त्री पंडितांनी विधवा विवाहाचे समर्थन केले . ( लोकहितवादीनी नाशिकला विधवा पुनर्विवाह मंडळाची स्थापना केली होती) ईश्वर चंद्र विद्यासागर यांनी भारतात सुरुवातीला 1850 मध्ये विधवा पुनर्विवाहावरील बंदी हटविण्याची मोहिम सुरु केली होती. न्या . रानडे, लोकहितवादी ,विष्णूशास्त्री पंडीत , डॉ भांडारकर , कृष्णशास्त्री चिपळूणकर इ. सुधारकांनी व त्या काळातील वृत्तपत्रांनी विद्यासागरांनी केलेली विधवा पुनर्विवाह चळवळ चांगलीच उचलून धरली.

बालविवाह , बहूपत्नीत्व, वैधव्य अशा प्रश्नांनी व्यापलेली स्त्रियांची संख्या सुधारकांच्या समोर होती. या प्रश्नावर केसरी , मराठा, शतपत्रे इ . मधून मोठ्या प्रमाणात लेखन होत होते. बेहरामजी मलबारी या पारशी गृहस्थांने 1885 मध्ये बालविवाह व सक्तीचे वैधव्य या विषयावर लेख प्रसिध्द केला. त्यानंतर संमतीवयाची मोहिम हाती घेतली . त्या काळातील ब्रिटीश शासनाने मात्र विवाह या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्विकारले होते. याच काळात फुलमनी या बंगाल मधील बालविवाहितेला पतीच्या लैगिंक जबरदस्तीमुळे मृत्यूमुखी पडावे लागले. नकळत्या वयातील विवाह मान्य नसल्यामुळे महाराष्ट्रातील रखमाबाई या हायकोर्टात गेल्या . त्यांना रानडे , आगरकर सारख्या सुधारकांचा पाठींबा होता . व सर्व परिस्थितीमुळे ब्रिटिश शासनाला संमती वयाचे बील पास करावे लागले . व1891 मध्ये संमती

वयाचा कायदा झाला स्त्री प्रश्न सोडविण्यास सुधारकांनी संमती वयाच्या कायदाचा आधार घेतल्याने सुशिक्षित्व समाजाचे स्त्री सुधारणा कायदा चळवळीकडे लक्ष वेधले गेले.

स्त्रीसुधारणा चळवळीमध्ये स्त्री शिक्षणाच्या प्रश्नालाही सुधारकांनी चालना दिली. समाज ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळेत मुलीना पाठविण्यास सहज तयार होत नाही हे लक्षात येताच खाजगी शिक्षण संस्था स्थापण्यास सुधारकांनी सुरुवात केली. म. फुल्यांनी पुण्यात मुलींसाठी 1848 मध्ये पहिली शाळा काढली . स्वतःची पत्नी सावित्रीबाई हिला शिक्षिका म्हणून शिकवून तयार केले . मुलीनी शाळेत यावे म्हणून पालकांची भेट घेवून मनः परिवर्तन करण्याचा प्रयत्नही केला. अस्पृश्य मुलामुलीना शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून शाळा काढ़ली . पुणे शहराच्या आसपास वीसभर शाळा सुरु केल्या .अस्पृश्यांना शिक्षण मिळावे म्हणून ते जसे धडपडले तसेच स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी सुध्दा त्यानी प्रयत्न केले. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून अडचणीत सापडलेल्या विधवांची बांळतपणे सुखरुप होण्यासाठी फुले दाम्पत्यानी प्रयत्न केले. पंढरपूर येथे अनाथ बालक आश्रमांची स्थापन त्यांनी केली. विधवा केशवपनाचे संकट दूर करण्यासाठी नापीतांचा बहिष्कार , विधवा पुनर्विवाह परिषदेची स्थापना अशी कार्ये तत्कालीन कडव्या सनातनी वातावरणात म. फुल्यांनी हाती घेतली. सनातनी हिंदूनी त्याला विरोध केला . समाजाने वाळीतही टाकले. सनातनी हिंदूंचा असा रोष ओढावूनही फुल्यांनी अपेक्षित असलेले स्त्री - उत्थानाचे कार्य चालूच ठेवले . फुल्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे असे हंटर कमीशनपुढे मागणी केली. ना. गोखलेनीही 1911 ते 1918 पर्यंत सतत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याबाबत दिल्ली विधीमंडळात ठराव मांडला होता. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या प्रसारात महत्वाची भुमिका बजावली. विधवा पुनर्विवाह परिषदेची स्थापना केली. अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली. भारतातील पहिले महिला विद्यापीठ स्थापन केले. स्वतः बालविधवेशी पुनर्विवाह करुन समाजासमोर आदर्श निर्माण केला. विधवा स्त्रियांसाठी वसतीगृह, आश्रम , शाळा यांची पुण्यात निर्मिती केली. व यासाठीच आपले जीवन वाहिले . मुबंईत

बद्रुद्दिन तय्यबजी आणि बेगम जंजीरा यानी मुस्लीम मुलींसाठी शाळा सुरु करण्यात पुढाकार घेतला होता. अशाप्रकारे 19 व्या शतकात स्त्री शिक्षणाव्दारेही स्त्रीसुधारण्याचे कार्य सुधारणावादी संघटनेने हाती घेतले होते . बंगाल मधील ब्राम्हो समाज, मद्रासमधील थियोसॉफिकल सोसायटी , उत्तरेकडील आर्य समाज , मुंबईतील प्रार्थना समाज अशा संघटनांनी स्त्री शिक्षण व सुधारणेचे कार्य हाती घेतले होते . 19 व्या शतकातील विविध संस्था, संघटना , जातीय संस्था , वर्गीय संस्था इ. नी स्त्रियांचे प्रश्न हाताळून स्त्री सुधारणेचा प्रयत्न केला होता. [22]

**स्त्री सुधारणा चळवळ :-**

महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची सुरुवात प्रत्यक्षपणे न होता नियतकालिकांच्या माध्यमातून चर्चेला सुरुवात होवून झाली. समाजात सामाजिक , राजकीय , धार्मिक परिवर्तन घडवून आणण्याच्या उददेशाने बाळशास्त्री जांभेकरानी 6 जाने 1832 रोजी मराठीतील पहिले साप्ताहिक वृत्तपत्र ' दर्पण ' सुरु केले.आणि ज्ञान प्रसारास प्रारंभ झाला. पाश्चात्य शिक्षणामुळे जांभेकर हे उदारमतवादी बनलेले होते , त्यांनी महाराष्ट्रात समाजसुधारणांची बीजे रोवण्यास सुरुवात केली. समाजसुधारणेमध्ये त्यांचा भर पतितपरावर्तन नियतकालीकास प्रारंभ आणि विधवा विवाहाचा पुरुस्कार यावर होता . 19 व्या शतकात उघडपणे स्त्रियांवर अन्याय होत होता . त्या विरोधात संपादकीय लेख लिहून , इतरांनाही लिहिण्यास प्रवृत्त करुन स्त्रियांच्या प्रश्नावर लहान स्वरुपाचे लेख प्रकाशित होवू लागले . ' दर्पण ' मधून स्त्रियांना शिक्षण मिळावे, बालविवाह पध्दत बंद व्हावी, विधवा पुर्नविवाह घडवून आणण्याची परवानगी असावी या सारख्या स्त्री प्रश्नांची चर्चा केली गेली .

या चर्चेच्या आधाराने प्रेरीत होवून दर्पणच्या अंकात तेलंग ब्राम्हणाचा लेख , त्यावरील परशूराम क्षेत्रस्य ब्राम्हणाचा अभिप्राय व संपादकीय निवेदन अशा स्वरुपातील दीर्घ लेख प्रसिध्द

झाला. हाच लेख पुढे निबंध म्हणून ' पुनर्विवाह प्रकरण ' नावाने मुबंईत प्रसिध्द झाला . मराटी भाषेतील हा पहिलाच निबंध होता. [23]

लोकहितवादीनी आपल्या शतपत्राच्या माध्यामातून स्त्री प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न केला . त्यांचा स्त्री जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन न्यायिक , स्त्रीपुरुष समानतेच्या आधारावर मानवतावादी स्वरुपाचा होता. त्यांनी स्त्री चे समाजातील स्थान स्पष्ट करताना म्हटले कि, " ज्या देशात स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहीत. त्या देशात लोकांची स्थिती वाईट असते. [24] मराठी ज्ञान प्रसारकाच्या माध्यामातूनही स्त्री प्रश्न हाताळले गेलेले आढळते . मराठी ज्ञान प्रसारकाच्या हाती आलेल्या 180 अंकामध्ये स्त्री समस्येवर लिहिलेल्या लेखांची संख्या 45 भरते . समाजामध्ये सुधारणेचे वारे आहे , समाजाची स्थिती बदलत आहे, त्याप्रमाणे समाजापरिवर्तन ह्येण्यासाठी जुलै 1850 च्या मराठी ज्ञान प्रसारकात सखाराम दीक्षीत या व्यक्तीने लिहिले आहे कि, मुलींच्या शाळा काढणे, त्या उपवर झाल्या कि त्यांच्या लग्नाचा मांड मांड्ण्याबाबतचा पुरस्कार , स्त्रियांस अनिर्वचनीय दु;ख देणारे प्रतिबंध टाकावे इ . सुधारणावादी विचार पसरत चालले आहेत. [25]

म्हणजेच हा काळ एका विलक्षण चेतनेने भारलेला होता याची प्रचिती येते. ' शिक्षा लाभ' या निबंधात (एप्रिल 1851 ) हरिकेशवजी म्हणतात , " पतीसारखेच शिक्षण स्त्रीला असल्यास उभयतांचे सुख आहे . पत्नीशी प्रेमाने वागणे , मुलांना कसे शिकवावे , घर खटले कसे नीट चालवावे , पतीव्रताधर्माने वागून विद्यानंदाचा उपभोग कसा घ्यावा हे शिकलेल्या स्त्रीलाच कळेल " [26] अशा निबंधाच्या माध्यमातून स्त्रीशिक्षणाने कशी सुधारणा होईल, स्त्री शिक्षणाचा फायदा कुटुंबाला कसा होईल हे विचार सनाजात कसे पक्के बिंबले जातील हाच प्रयत्न होता असे म्हणता येईल.

'स्त्री शिक्षणविषयक विचार' ( मे 1851), 'स्त्री शिक्षण विषयी विचार (एप्रिल 1851 )' अशा निबंधात स्त्री शिक्षणाचे महत्व - समर्थन तसेच पुरुषाप्रमाणेच तीही माणूस आहे . याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. [27]

ज्ञानप्रसारकाच्या माध्यमातून स्त्रियांस विद्याभ्यासाची आवश्यकता , स्त्री शिक्षणाची आवश्यकता , विद्यावृध्दी विषयी विचार , स्त्रियांस वागविण्याची पध्दती , एतदेशीय स्त्रियांची स्थिती , चांगली बायको, स्त्री शिक्षण हे सात निबंध स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून देणारे आढळतात . परंतु स्त्रियांच्या इतर समस्यांची चर्चा करणारे लेख कमी स्वरुपात आहेत. मात्र या नियतकालिकाने स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. विधवा विवाह , बालविवाह सारख्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे प्राथमिक कार्यही या मराठी ज्ञानप्रसारकाने केले. [28]

बाबा पद्मनजीनी ' स्त्री विद्याभ्यास निबंध' नावाच्या लिहिलेल्या छोट्या पुस्तिकेत वृध्द गृहस्थ आणि सुशिक्षित तरुण यांच्या संवादातून स्त्री जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. स्त्री शिक्षणाने कुटूंबातील स्त्री कशी सुधारेल याचे विवेचन केले आहे . स्त्रियांचा ईश्वर व धर्म या व्यवहारातला सहभाग कशा पध्दतीचा असावा हेही स्पष्ट केले आहे . [29]

'यमुना पर्यटन ' या कंदबरीतून विधवा जीवनाची व्यथा मांडली आहे . विधवेला व्याभिचाराला कसे बळी पडावे लागते हे स्पष्ट केले आहे . कादंबरीचा नायक विनायकराव मृत्यू पावल्यानंतर त्याची पत्नी यमुना ही केशवपन न करता पतीच्या मित्राकडे जाते . ख्रिस्ती धर्म स्विकारुन पुनर्विवाह करते . म्हणजे विधवा जीवन , पुनर्विवाह हा प्रश्न या कांदबरीतून हाताळला गेलाच मात्र ही सुधारणा करताना धर्म आडवा आला तर प्रसंगी धर्मांतर करण्याची तयारीही दर्शवली आहे . [30]

आगकरांनी ' सामाजिक सुधारणा आणि कायदा ' या लेखातून बालविवाह रुढीवर आणि त्या रुढ़ीचे समर्थन करणाऱ्यावर टिका केली आहे. बाल विवाह आणि त्यापासून होणारे अनर्थ टाळण्यासाठी त्यांनी स्वंयवर पध्दतीचा पुरस्कार करावा असे मत व्यक्त केले आहे. स्त्री जीवनाचा विकास आणि सुधारणा व्हावी यासाठी त्यांनी ' प्रियराधन ' , ' स्वंयवर ', ' वल्लभोपसना ' या लेखातून आपली मते प्रदर्शित केली आहेत. [31]

बालविवाहाचे दुष्परिणाम ' केसरी ' कारांनी अर्थशास्त्र दृष्ट्या बालविवाहाचा विचार (3 ऑगस्ट 1881) " व्यवहार दृष्ट्या बालविवाहाचा विचार " ( 10 ऑगस्ट 1881 ) "

स्त्रीदास्य विमोचन " (31 ऑगस्ट 1882 ) या लेखातून स्पष्ट केली आहे. बाळकृष्ण लक्ष्मणाशास्त्री बापट यांनी " विधवा विवाह खंडन" (1865) या ग्रंथातून विधवा विवाह प्रत्यक्ष कृतीने व्हावेत असे आवाहन केले आहे. विष्णूशास्त्री पंडित यांनी विधवा पुनर्विवाह प्रश्नासाठी ' ब्राम्हणकन्या विवाह विचार' हे पुस्तक लिहिले . स्त्रियांना समाजात समानतेचे स्थान मिळावे म्हणून 'स्त्रियांचे अधिकार व्याख्यान' ( 1875 ) हे पुस्तक लिहिले . नारायण केशव वैद्य यानी 'गतभर्तृ कारोवन आणि तन्निवारणार्थ यथान्याय शास्त्रोक्त साधन' (मुंबई 1883 ) व ' विधवा पुनर्विवाह निषेधकात चष्मा ' ( मुंबई 1८86 ) या पुस्तकामार्फत विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला.

म. गो. रानडे यांनी विधवा प्रश्नांसंदर्भात ' टाईम्स ऑफ इंडीया ' त लेख लिहिले . ' इंदूप्रकाश', ' ज्ञानोदय ' यांच्या पुरवणीव्दारे विधवांची दुखेः मांडली गेली . केशवपन विरोधातही ' दीनबंधू ' साप्ताहीकामधून लेखमाला सुरु होती. हिंदू विधवेचा छळ केशवपनाच्या मार्गाने होतो असे मुलीच्या पालकांनी खटला केल्यास त्याचा खर्च आपण देऊ अशी जाहिरात 'इंदूप्रकाशा'त आली होती .मामा परमानंदानी बॉम्बे ग़ॅझेटमध्ये पत्राव्दारे नवीन विधवेचे केशवपन जो न्हावी करेल त्यास आपल्या घरी येण्यास बंदी करावी असे आवाहन केले होते. [32]

सुधारकांनी अशा प्रकारे स्त्री प्रश्न हाती घेऊन स्त्री सुधारणा चळवळीला चालना दिली. कायद्यांच्या मार्फत सुधारणा घडवून आणण्यासाठीही सुधारकांनी प्रयत्न केले . त्यासाठी ब्रिटीश शासनाला निवेदने सादर केली . सतीबंदीचा कायदा , संमतीवयाचा कायदा , शारदा कायदा , पुनर्विवाह कायदा अशा कायद्यांची निर्मिती केली गेली. सती बंदी कायदाचा उल्लेख पुर्वी आलेलाच आहे, या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र म्हणावी इतकी झाली नाही . परंतु समाजावर या कायद्याचे दडपण आले असे म्हणता येईल . या कायद्याबरोबरच केशवपन , स्त्री शिक्षण या चळवळी सुरुच होत्या , या सर्वांचा थोडक्यात आढ़ावा पुढ़ीलप्रमाणे -

**संमती वयाचा कायदाः-**

मुलीची शारिरिक वाढ़ पुर्ण होण्यापुर्वीच तिचा विवाह केला जात असे . त्यामुळे नकळत वयात तिच्यावर पत्नीत्वाचा हक्क सांगणे , तिच्यावर संभोगाचा अत्याचार हा स्त्रीच्या छळाचाच प्रकार आहे. या प्रकारच्या प्रश्नाला खरी चालना प्राप्त झाली, ती बंगाल प्रातांत ऑगस्ट 1890 मध्ये 30 वर्षाच्या हरिमोहन नांवाच्या गृहस्थाने 10 वर्षाच्या स्वतःच्या अल्पवयीन पत्नीवर केलेल्या बलात्कारामुळे . यामध्ये 10 वर्षाच्य निरागस मुलीचा मृत्यु झाला . फुलमनी खटला म्हणून गजलेल्या या खटल्यामुळे संमती वयाची मर्यादा वाढविली पाहिजे, हा विचार पुढ़े आला . सुशिक्षित तरुण सुधारकाना स्त्री पुरुषांची मानसिक, शारिरिक वाढ़ होण्यासाठी प्रौढ़ विवाह पध्दत योग्य आहे, असे वाटू लागले . प्रौढ़ विवाह अस्तित्वात आल्यास स्त्रियांचे बालविवाह बंद तर होतीलच शिवाय बालविधवांची संख्याही कमी होईल असा दृष्टीकोन त्यामागे होता .

ब्राम्हो समाजाच्या शपथ पत्रकातही मुलीचे लग्नाचे वय चौदा असावे, अशी अट घातली होती. मुलीच्या लग्नाचे वय वाढ़ावे म्हणून प्रार्थना समाजानेही प्रयत्न केले . न्या. रानडे यांनी पुण्यातील सुशिक्षितांच्या सह्या घेण्याचा प्रयत्न करुन मुलाचे लग्नाचे वय 17-18 तर मुलीचे लग्नाचे वय 10-11 वर्षाच्या आत असू नये, असे पत्रक काढ़ले . मलबारी यांनीही हा प्रश्न उचलून धरला. संमती वयाचे बील 1891 मध्ये पास झाले . पुढ़े 1922 व 1924 असे दोनदा कायदे कौन्सिलात संस्करण होऊन मुलीच्या संमती वयाची मर्यादा ही 13 वर्षाची ठरविण्यात आली.

**शारदा कायदा :-**

इंग्रज सरकारने 1929 साली शारदा कायदा , बालविवाह प्रतिबंधक कायदा केला. कायद्याने 12 वर्षाखालील मुलगी व 15 वर्षाखालील मुलगा यांच्या विवाहास बंदी घातली . हा कायदा अस्तित्वात येण्याची खरी मुळे आढ़ळतात ती राजा राममोहन रॉय व ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी केलेल्या बालविवाह प्रथा बंदीच्या प्रयत्नात . या चर्चेला महाराष्ट्रात सुरुवात

झाली ती बेहरामजी मलबारी यांनी लिहिलेल्या ' असंमत वैधव्य व बालविवाह ' या लेखावरून . नंतर तत्कालीन सुधारक न्या. रानडे , डॉ. भांडारकर , आगरकर , न्या. तेलंग , लो. टिळक इ. नी या विषयावरील आपली मते व विचार प्रगट केली . या कायद्यानुसार मुलीचे व मुलाचे विवाह वय अनुक्रमे 15 व 18 असे निश्चित करण्यात आले. तर सध्या ही वयोमर्यादा 18 व 21 अशी आहे . याचा परिणाम म्हणजे सध्या बालविवाहाला (काही अपवाद वगळता ) आळा बसला आहे . व बालविवाहांची संख्या नगण्यच आहे असे म्हणता येईल.

**विधवा विवाह कायदा :-**

समाजात विधवा विवाह आणि त्यापासून झालेली संतती यांना संरक्षण प्राप्त व्हावे, यासाठी ईश्वरचंद्र विदयासागर यांनी विधवा पुनर्विवाहाचा कायदा व्हावा म्हणून सातत्याने त्याचा पाठपुरावा केला . एक हजार लोकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन सरकारकडे (4 ऑक्टोबर 1855 ) ला अर्ज सादर केला . त्यातील आशय असा होता - विधवेने पुन्हा लग्न न करणे ही हिंदू समाजातील क्रूर रुढी असून ती निसर्ग विरोधात आहे . त्यामुळे सामाजिक नितीवर त्याचा परिणाम होतो. विधवाचा हा प्रश्न बालविवाहामुळेच निर्माण झालेला आहे . राणी व ईस्ट इंडिया कंपनीच्या कोर्टातील कायदा हा विधवा विवाह बेकायदेशीर ठरवतो व अशा विवाहापासून झालेली संतती ही अनौरस मानतो. समाज व्यवस्थेतील ही हानिकारक बाब आहे.

अशा आशयाचा अर्ज विदयासागर यांनी केला . तरी या सुधारणेला विरोध म्हणून छतीस हजार सह्याचा प्रति अर्ज सनातन , पुराणमतवादयानी सादर केला . नंतर जे. पी. ग्रांट यांनी हे बील कायदे कौन्सिल पुढे मांडले . पं ईश्वरचंद्र यांच्या प्रयत्नाला यश येऊन अखेर हे बील 1856 मध्ये पास झाले. विधवा पुनर्विवाह कायदा पास झाला. विदयासागर यांनी प्रथम विधवा विवाह बंदी विरोधात आवाज उठविला . विधुर जर पुनर्विवाह करीत असेल तर विधवेने का करु नये? असा प्रश्न त्यांना पडला . यासाठी त्यांनी पुस्तिकाही लिहिली . हे सर्व करीत असताना विदयासागर यांना विरोधही तितकाच झाला. [33]

**केशवपन चळवळ:-**

धर्माच्या रिंगणात अडकलेला समाज पतीला मुक्ती मिळावी म्हणून विधवेने सौभाग्य अलंकाराबरोबर आपले केशसंभारही उतरावे अशी आशा बाळगतो. या चालीचे सर्मथन करताना असे म्हट्ले जाई की, विधवेने केशवपन केले नाही तर तिच्या केसातून जितके थेंब गळतात , त्या प्रत्येक थेंबा गणीक पतीला नरकवास भोगावा लागतो. या प्रथेमुळे आपोआपच लहान अगर तरुण मुलीना विद्रूप व्हावे लागे. जर विधवा सकेश असेल तर धार्मिक कार्यात तिला प्रवेश नसे . अशावेळी तिला अपशकूनी मानले जाई. वाळीत टाकले जाई , तिच्या घरालाही वाळीत टाकले जाई , त्यामुळे जबरद्स्तीने विधवेचे केशवपन करुन तिला सोवळी केले जाई . केशवपन केलेल्या अनेक विधवाना व्रतवैकल्ये करावे लागे. एक वेळ जेवणे उपासतापस करणे असे बंधन तिच्यावर असे तिचे दर्शन अपशकूनी मानले जाई . अंधार कोठडीत तिला रहावे लागे . या सर्व गोष्टीमुळे तिच्या वैधव्याच्या दु;खात भरच पडली होती . अशा क्रूर चालीविषयी आगरकर म्हणतात , " लहानपणापासून ज्यांची जोपसना केली , ज्यास नाहू माखू घालून वाढविले, ज्यास नाना भूषणानी श्रृंगारिले असे केस क्षणार्धात नाहीसे होऊन आपण सर्वांच्या तिरस्कारास प्राप्त होणार व पंधरा वीस दिवसांनी पूर्वस्थिती येण्याची तर आशाच नाही परंतू ज्याचे मुखावलोकनही करावयास नको , अशा त्या परक्या नापिकापुढे दर पंधरवड्यास मान वाकवावी लागणार हे विचार मनात येऊन या विटंबनेस सर्व स्त्रिया आपण होऊन राजी होतील अशी नुसती कल्पनाही करता येणार नाही ." [34] आगरकरांनी आपल्या सुधारक या अंकात 3 मार्च 1890 ला " अजून तरी सावध व्हा" या लेखात न्हाव्याकडून जर विधवांचे केशवपन करण्यास विरोध झाला तर किती बरे मजा होईल" [35] असे उदगार काढले आहेत. म्हणजे समाज सुधारणा करताना नापितांची भूमिका केवढी महत्वपूर्ण ठरेल. हेही ते दर्शवितात. पं. रमाबाई यांनी त्यांच्या, ' द हायकास्ट हिंदू वुमेन' या पुस्तकातही कनिष्ठ वर्गाने केशवपनाची रुढी पाळून स्वतःला कसे उच्चवर्णीय समजून घेत हे सांगितले आहे.

आनंदी बाई कर्वे यांनी 'माझे पुराण' या आपल्या आत्मचरित्रात स्वतःच्या केशवपनाचा प्रसंग सांगितला आहे. त्या म्हणतात, " लहान पणीच नवरा मेल्यामुळे मला त्याचे इतके दुःख झाले नाही, विधवापणाची खरी जाणीव मला त्यादिवशी झाली. इतर सधवा स्त्रियापेक्षा माझ्या आयुष्यात काहीतरी कमी आहे ते मला कळत होते. पण आपले आयुष्य किती खडतर आहे त्याची मला कल्पना नव्हती. विधवा मुलींची इतकी विटंबाना का होते? मी तो संबंध दिवस दडुनच घालविला पण काय उपयोग त्याचा? अशा कितीतरी मुली आत्तापर्यंत माझ्या सारख्या रडल्या असतील पण त्याचे समाजाला काय?" [36] यावरुन केशवपनाची प्रथा किती भयप्रद होती याचा अंदाज येतो. ही प्रथा नष्ट व्हावी यासाठी केशवपनाची चळवळ सुधारकांनी सुरु केली.

1880 च्या कालखंडानंतर विधवा विवाह चळवळीस म्हणावे इतके प्रभावी नेतृत्व लाभले नाही. विधवाविवाहासाठी फ़ार मोठे प्रयत्न झाले परंतु त्यास अपेक्षित यश लाभले नाही. याचा परिणाम मात्र स्त्रियांवरील ( विधवांवरील ) जाचक रुढी, चाल नाहीशी करण्यासाठी प्रयत्न होऊ लागले. विधवांवरील जाचक अटींमध्ये केशवपनाचा प्रकार रानटी होता. केशवपनाने विधवेला विद्रुप करणेचा प्रयत्न होत असे. विधवांनी केसामध्ये अलंकार घालून शृंगार करु नये एवढाच शास्त्राचा प्रतिबंध असल्याचे विष्णुशास्त्री पंडितानी सांगितले होते. [37] तर लोकहितवादीनी आपल्या 'स्वाध्याय' ग्रंथात केशवपनाला वेद, सूत्र, स्मृतीचा पुरावा नसल्याचे सिध्द करुन ही चाल पाडणारा स्त्री वर्गाचा कट्टर शत्रू होता असे म्हटले होते. [38]

व्यंकट रंगो कट्टी यांनी 'विधवापन अनाचार' ( 1889 ) या ग्रंथात चिकित्सक संशोधन केले त्यांनी हिंदूच्या मूळ ग्रंथात केशवपनाला आधार नाही हे स्पष्ट केले. इतकेच नव्हेतर शके 1450 पूर्वी असलेल्या स्मृती ग्रंथात आधार असल्याचे दाखवून द्यावे असे आवाहन केले. त्यासाठी रु. 500/- चे बक्षिसही ठेवले. तसेच दुसते रु. 500/- चे बक्षिस हे केशवपनाने विधवा पवित्र होते हे ग्रंथाव्दारे दाखवून द्यावे यासाठी ठेवले. [39] मात्र असे सिध्द

करुन दाखविण्यास कोणीच पुढे आले नाही. 'इंदुप्रकाश' मधून एका पत्रकाराने केशवपनाला कायद्याने प्रतिबंध करुन जे न्हावी केशवपन करतील त्यास पन्नास रुपये दंड ठेवावा असे सुचविले. [40]

अशाप्रकारे केशवपन चळवळीला सुरुवात झाली तरी खरी चालना मिळाली ती महात्मा फुले आणि ' दिनबंधू' चे संपादक कृ.पा. भालेकर ( 1850 - 1910) यांच्यामुळे. 'दिनबंधू' च्या माध्यमातून भालेकरांनी लेखमालेच्या आधारे विधवांचे केशवपन न करण्याविषयी न्हावी लोकांना आवाहन केले. [41] मामा परमानंदानी ' इंडियन स्पेक्टेटर' मधून एक लेखमाला लिहून दिनबंधुचे अभिनंदन केले. व त्या संदर्भात चांगल्या सूचनाही केल्या. [42]

दिनबंधूने केलेल्या आवाहनाचा परिणाम होवून मुबंईमध्ये न्हाव्यांच्या तीन सभा झाल्या. 14 एप्रिल 1890 रोजी न्हाव्यांची भव्य सभा मुंबईत झाली. त्यामध्ये मुंबई पुणे परिसरातील हजारभर न्हावी हजर होते. सभेत भाषण करताना एका व्यक्त्यांने आपण केशवपन सारख्या पातक चालीला सहकार्य केल्यामुळे आपल्याला धंद्यात उर्जितावस्था प्राप्त होत नसल्याचे सांगितले. त्या सभेत सर्वानुमते ठराव होऊन केशवपनाच्या अमानुष रुढीला सहकार्य न करण्याचा निर्धार करुन न्हावी लोकांनी विधवा केशवपन करण्याचे नाकारले.

अशाप्रकारे समाजामध्ये केशवपना विरुध चळवळ उभी झाल्याचे आढळते.

**स्त्री शिक्षणाची चळवळ** :-

स्त्री शिक्षणाची सुरुवात महाराष्ट्रात मुंबईत करण्याचा प्रयत्न प्रथम गंगाबाई नांवाच्या एतद्देशीय स्त्रीने मार्च 1824 मध्ये केला. मार्च मध्ये ती शाळा सुरु झाली परंतु मे मध्ये पटकीची साथ मुंबईत फ़ैलावली होती त्यामध्ये गंगाबाईचा मृत्यू झाला आणि त्यांनी सुरु केलेली शाळा बंद पडली परंतु त्याच्या या कार्याच्या प्रभावाने 1825 च्या शेवटपर्यत आणखी काही शाळा सुरु होऊन त्यामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थिनीची संख्या 75 होती. 1826 मध्ये 204 विद्यार्थिनी लेखन, गणित, वाचन पाठांतर अशा स्वरुपातील शिक्षण एकूण 9 शाळामधून

घेत होत्या. मिस सिथिया फ़ेरार या 1827 मध्ये मुंबई मिशनमध्ये रुजू झाल्या. त्यांच्या परिश्रमामुळे 400 च्या वर विद्यार्थीनी तेथे शिक्षण घेऊ लागल्या.

हळूहळू महाराष्ट्रभर ख्रिस्ती मिशन-यांच्या पत्नी या स्त्री शिक्षणाची धुरा सांभाळण्यासाठी पुढे आलेल्या आढलतात. नगरला 1832 - 33 च्या आसपास मिसेस रीड यांनी मुलींच्या दोन शाळा सुरु केल्या. त्याचबरोबर ख्रिस्ती धर्माचा प्रभाव पडावा व हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरितींपासून संरक्षण व्हावे म्हणून निवासी शाळेची सुरुवातही केली

चर्च मिशनरी सोसायटीनेही 1826 मध्ये मुलींची शाला सुरु केली. नंतर नाशिक व ठाणे जिल्ह्यातही अनेक शाळांची सुरुवात झाली. [43] 1848 मध्ये एल्फ़िन्स्टन कॉलेज मध्ये शिकलेल्या तरुण सुधारकांच्या फ़ळीने ' स्टुडंट्स लिटररी ॲन्ड सायंटिफ़िक सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फ़त 1849 मध्ये मुलींची स्वतंत्र प्राथमिक शाळा सुरु करण्यात आली. [44] ही संस्था जरी एतद्देशीय होती तरी त्यात युरोपियन लोकांचा सहभाग काही प्रमाणात होता.

1850 च्या दरम्यान समाज सुधारणेला महत्व प्राप्त झाले होते. त्यामध्ये शिक्षण विषयक सुधारणेतील स्त्री शिक्षणाचा प्रश्न कळीचा बनला होता, ज्या स्त्रियांचे लिहीप्या, वाचण्यापुरते शिक्षण झाले होते त्यांचे तुरळक लेखन अपवादात्मक रुपात विविध नियतकालिकांमध्ये येत होते.

नियतकालिकांमध्ये स्त्रियांच्या लेखनाची सुरुवात ही 1855 ला झाली. म. फ़ुलेंची विद्यार्थिनी मुक्ताबाई वय वर्षे 14, हीचा ज्ञानोदयाच्या अंकात , 'मांग महाराच्या दुःखा विषयी निबंध ' 15 फ़ेब्रु. व 1 मार्च 1855 ला दोन भागात प्रसिध्द झाला "..... वेद जर ब्राम्हणासाठी आहेत तर आम्हासाठी काही नाही हे भगवान तुजकडून आलेला कोणता धर्म आम्हास कळीव, म्हणजे आम्ही सर्व त्याच्यासारखे रितीने अनुभव घेऊ. परंतु इतकेच नाही तर आम्हा गरीब मांग महारास हाकून देवून आपण मोठमोठ्या इमारती बांधून हे लोक बसले. व त्या इमारतीच्या पायात आम्हास तेल, शेंदूर पुसण्याचा व आमचा निरवंश करण्याचा क्रम

चालविला होता..... एका शिवण्याच्या बंदीपासून आम्हावर किती दुःखे पडतात ...... आम्हास कोणी चाकरी ठेवीत नाही ...... ज्या वेळेस आमच्यातील स्त्रिया बाळंत होतात त्यावेळेस त्यांच्या घरावर छप्पर सुध्दा नसते. म्हणून हीव, पाऊस, यांच्या उपद्रवामुळे त्यास किती दुःख होत असेल बरे! .... एखाद्या वेळेस त्यास बाळंत रोग झाला तर औषधास व वैद्यास पैसा कोठून मिळणार? असा कोणता तूम्हामध्ये संभावित वैद्य होता की त्याने लोकास फुकट औषधे दिली? ........ हा जुलूम विस्ताराने लिहू लागले तर मला रडू येते... "[45]

या निबंधातून तत्कालीन सामाजिक स्थिती हाताळण्याचा प्रयत्न झालेला आढळतो शिवाय सामाजिक विषमता, दिन दलित स्त्रियांचा प्रश्न ही मांडलेला आहे. महार मांगाना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते हे ही स्पष्ट मांडले आहे. स्त्री शिक्षणामुळेच परखड निंबंध लिहीण्याची क्षमता या मुलीमध्ये निर्माण झाल्याचे आढळते.

मध्यंतराच्या काळात स्त्री लेखन क्वचितच झाले. या काळातच सूमित्र ( 1855 ), स्त्री भूषण ( 1864), स्त्री ज्ञानप्रदिप (1869), रवि ज्ञान प्रबोध (1870), अबला मित्र (1876), स्त्री बोध चितांमणी ( 1881) अशी स्त्रियांसाठी नियतकालिके सुरु झाली. 1886 ला मनोरंजन मासिक सुरु झाले. 1887 ला, 'निबंध चंदिका' मनोरंजन मासिकत सामील करुन घेतले गेले व ' मनोरंजन आणि निबंध चद्रिका ' या जोडनावांने नियत कालिक सुरु झाले. या मासिकांमधून स्त्रियांनी कविता, स्फूट लेखन,कथा, इत्यादी माध्यमातून विविध लेखन प्रकार, विषय अशा लेखनांचा विस्तार केला. 1886 मध्ये आनंदीबाई लाड यांनी 'आर्य भगिनींचे' संपादन सुरु केले पण काही महिन्यातच त्याचे प्रकाशन बंद झाले. माणिकताई लाड यांनी आर्य भगिनी नांवानेच पुन्हा 1889 मध्ये मासिक सुरु केले.

मनोरंजनच्या अंकात ( डिसें. 1896) 'बिचारी आनंदीबाई' ही शांताबाईची पहिली कथा प्रसिध्द झाली. 1910 मध्ये मनोरंजनच्या दिवाळी अंकात 'आमच्या वधुवरांची लग्नाची वयोमर्यादा काय असावी व ती का? ' या विषयावर संपादक का.रा. मित्र यांनी

परिसंवाद घेतला. या परिसंवादात 26 जणांचे लेख होते. त्यामध्ये 8 स्त्रियांनी आपले मत स्पष्ट केले होते. या स्त्रियां म्हणजेच रखमाबाई केळवकर, काशिबाई हेरलेकर , काशिबाई कानिटकर, मानकबाई कोठारे, पार्वतीबाई आठवले, काशिबाई नवरंगे, लक्ष्मीबाई चंदावरकर, व श्रीमती रमाबाई रानडे होत्या. [46]

**संस्थात्मक चळवळी व स्त्री सभा :-**

संस्थात्मक चळवळीमध्ये स्त्री सुधारणेसाठी प्रयत्न करणारे स्त्री शिक्षणासाठी पुढे असणारे महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकनेते हे प्रार्थना समाजातील होते. पुनर्विवाह, प्रौढ विवाह, सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांचा वावर अशा सुधारणांचा स्विकार करण्यात प्रार्थना समाजाचे सभासद अग्रेसर होते. रानडे, चंदावरकर, भांडारकर, नवरंगे इ. सुधारक कुटुंबे स्त्रीसुधारणेची कल्पना प्रत्यक्षात आणीत होते. प्रार्थना समाजाने सुधारणा कार्यानंतर पहिल्या 10 वर्षानंतर स्त्री संघटनेला सुरुवात केली. स्त्रियांची पहिली सभा 1877 मध्ये खेतवाडीत 50 स्त्रियांच्या उपस्थितीत पार पाडली. यासभेसाठी बाबू प्रतापचंद्र मुजुमदार हे कलकत्त्याचे ब्राम्हसमाजी सुधारक उपस्थित होते. सभेच्या माध्यमातून स्त्रियांना विविध शास्त्रांची माहिती देण्यात आली. सखाराम अर्जुन. गोंविदराव कानिटकर, सदाशिवराव केळकर इ. चे मार्गदर्शन स्त्रीसभेला सतत लाभत होते. प्रार्थना समाजाची अशी महिला सभा म्हणजे स्त्री सभेच्या संघटनाची सुरुवातच म्हणावी लागेल.

पं. रमाबाईर्नी 1 मे 1882 रोजी पुण्यात आर्य महिला समाजाची स्थापना केली. नोव्हेंबर 1882 मध्ये मुंबईत स्थापना केली. या समाजाचे प्रामुख्याने दोन हेतू होते. एक म्हणजे भारतीय स्त्रियांवर रुढी परंपरेने चालत आलेल्या अत्याचारापासून स्त्रियांची मुक्तता करणे आणि दुसरे म्हणजे स्त्रियांची धर्म, निती, व्यवहार इ. ची शोचनीय स्थिती घालवून त्यांचा विकास व्हावा यासाठी प्रयत्नशील राहणे हे होय. या समाजाचे मुख्य उद्दीष्ट हे भारतातील सर्व प्रांतातील स्त्रिया या मुख्य सभासद असतील हे होते. या समाजाच्या कामकाजात काशिबाई

कानिटकर यांचा पुढाकार होता. प्रार्थना समाजाचे पाठबळ या समाजास होते. महिला आर्य सभेची कामकाजाची दिशा ही प्रार्थना समाजाच्या मार्गदर्शनानेच ठरविली गेली. आर्य महिला समाजाचा पाया हा स्त्री शिक्षण आणि स्त्री विरुध्द पुरुष अशा विचाराला छेद देवून पुरुषांची मदत स्विकारण्यात कमीपणा मानायचा नाही असा होता. [47] ही संस्था 100 वर्षापेक्षाही अधिक काळ टिकली. काशिबाई कानिटकर, रमाबाई रानडे, इ. सारख्या स्त्रियांनी या संस्थेच्या पालनाची जबाबदारी स्विकारली ही संघटाना महाराष्ट्रातील दिर्घकालीन संघटना ठरली.

1889 मध्ये मुंबईत शारदा सदन संस्थेची स्थापना झाली. 1890 मध्ये शारदा सदनाचे पुण्यात स्थंलातर करण्यात आले. पं. रमाबाईनी प्रामुख्याने बालविधवा असलेल्या स्त्रियांसाठी शिक्षण संस्था म्हणून शारदा सदनाची स्थापना केली. पहिल्या बालविधवा गोदुताई ही 24 व्या वर्षी दाखल झाली होती. याच पहिल्या गोदुताई जोशी या बालविधवेचा विवाह पुढे महर्षि कर्वे यांच्याशी झाला. शारदा सदन पुण्यात आले तेव्हा 64 विद्यार्थिनी तेथे शिक्षण घेत होत्या. शारदा सदनाची आर्थिक व्यवस्था ही अमेरिकेतून रमाबाई रानडे असोसिएशनने उचलली होती. प्रत्येक मुलीसाठी 10 पौंड खर्चाची तयारी असोसिएशनने दर्शविली होती. संस्थेच्या सल्लागार पदावर न्या. रानडे, रावबहाद्दूर कृष्णाजी नूलनार, न्या. तेलंग अशी मंडळी कार्यरत होती. पं. रमाबाईनी ख्रिस्ती धर्म स्विकारला होता. त्याचा प्रभाव त्यांच्या कार्यावरही पडला होता. धर्मनिरपेक्ष शिक्षणाची खात्री त्या सदनाच्या कार्यात देवू शकल्या नाहीत. याचा परिणाम म्हणूनच 1893 ला त्याचे स्थलांतर पुण्यातून केडगांव येथे करण्यात आले. अनेक विद्यार्थिनीनी ख्रिस्ती धर्म स्विकारला. साहजिकच अनेक पालकांनी आपल्या मुलींना परत नेले. अनेक मुली हुजुर पागेत दाखल झाल्या. अशा प्रकारे धर्मांतराचा व ख्रिस्ती प्रभावाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम जनसमाजावर झाला. [48] मात्र पं. रमाबाई या परिणामाने नामोहरण न होता नव्या उमेदीने त्यांनी केडगांव येथे आपले कार्य नेटाने चालू ठेवले. शारदा सदनाच्या जोडीला पुढे कृपासदन आणि मुक्तीसदन निर्माण झाले आणि नंतर पं. रमाबाईंची संस्था ही पूर्णपणे मिशनरी संस्था बनली.

1898 मध्ये मुंबईतील प्रसिध्द पारसी समाज सुधारक बैरामजी मलबारी आणि 'स्टेटस ऑफ़ इंडीयन वुमेन' या ग्रंथाचे लेखक दयाराम गिडुमल या दोघांनी ' सेवासदन ' संस्था स्थापंण्याचा संकल्प करुन त्यासाठी निधी गोळा केला. प्रत्यक्ष ती संस्था 1908मध्ये मुंबईत स्थापन झाली. संस्थेची पूर्ण जबाबदारी रमाबाई रानडे यांच्याकडे सोपविण्यात आली. रमाबाई रानडेंबरोबर मुंबईतील लक्ष्मीबाई चंदावरकर, माणकबाई कोठारे, रमाबाई भांडारकर इ. प्रतिष्ठीत स्त्रियांचाही या संस्थेत सहभाग होता. संस्थेने विविध योजनांच्या माध्यमातून आपले कार्य सुरु ठेवले. सभागृह, प्रार्थनागृह, ग्रंथालय, वाचनालय, शिक्षणवर्ग, मोफ़त दवाखाना, विद्यार्थीनी वसतीगृह इ. समृध्द योजना राबविल्या.

मुंबई सेवासदनाची 1909 मध्ये पुणे येथेही शाखा स्थापण्यात आली. पुढे काही वर्षातच पुण्याची शाखा मुंबई पासून वेगळी झाली. ' पुणे सेवासदन सोसायटी ' ही वेगळ्या हेतूने कार्यरत झाली. स्त्रियांची स्वायत्त संस्था म्हणून तिचा पाया भक्कम बनविला गेला. गोपाळकृष्ण देवधर यांच्या सारख्या हाडाच्या कार्यकर्त्यांनी संस्थेच्या सेवेसाठी संस्थेची पहिली पंचवीस वर्षे अविरत कष्ट वाहिले. सामान्य शिक्षण, इंग्रजी शिक्षणाचे वर्ग, उद्योगशाळा, प्रथमोपचार वर्ग, रुग्ण परिचारिका वर्ग, व अध्यापक महाविद्यालय अशा उपक्रमातून संस्थेचे कार्य फ़ोफ़ावत गेले. सेवा सदनाचे कार्य पुण्यापर्यंत मर्यादित न राहता 1920 नंतर महाराष्ट्रात इतर शाखेतही विस्तारले गेले. मुंबई, अलिबाग, बारामती, सोलापूर, नाशिक , नागपूर, अहमदनगर इ. ठिकाणी संस्थेचे काम सुरु झाले. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस ही महीला संस्था म्हणून पहिलीच होती.

स्त्रीला आधार आणि शिक्षण देऊन स्वावलंबी करण्याचा हेतू सेवासदनाने जोपासला, पं रमाबाईच्या शारदा सदनाचे वादळ पाहून सेवासदनाने स्वतःची स्वतंत्र देशीय आणि राष्ट्रनिष्ठ अशी वाटचाल सुरु ठेवली. त्यामुळेही सेवासदन आकाराला आले असे म्हणता येईल.

या सेवासदनासाठी रमाबाई रानडे यांना काशीबाई कानिटकर, सिताबाई भांडारकर, यमुनाबाई भाट इ. स्त्रियांचे सहकार्य प्राप्त झाले होते.

अशा संघटनाप्रमाणेच महाराष्ट्रात पुरुषांच्या सहकार्याने स्त्री सभाही छोट्या स्वरुपात अस्तित्वात आल्या. हुजूर पागेच्या सुवर्णमहोत्सवी ग्रंथात 1871 मध्ये पुण्यात ' स्त्री विचारवती ' स्थापन झाल्याचा उल्लेख आढळतो. [49] रमाबाई रानडे यांनी 1894 ला हिंदू लेडीज क्लबची स्थापना केलेली होती. पुण्यातही 1902 ला या क्लबची स्थापना झाली. नांवावरुन हिंदू लेडीज क्लब हिंदू स्त्रियांसाठी आहे असे वाटत असले तरी सर्व जाती धर्माच्या स्त्रियांसाठी ती खुली होती. ही संस्था स्त्री शिक्षणासाठी कार्यरत होती. या संस्थेमार्फ़त व्याख्याने, ग्रंथालय, प्रदर्शन, व्यवसाय प्रशिक्षण इ. सारखे उपक्रम राबविले जाई. या संस्थेने न्या. रानडे स्मारक फ़ंड उभारले तसेच विविध शाळा, बालिकाश्रम, अनाथ बालकाश्रम इ.स देणगी दिलेली आहे.[50] 1899 मध्ये अमरावती येथे व-हाडातील प्रतिष्ठीत स्त्रियांनी 'वनितासमाजाची' स्थापना केली. या समाजाचे अध्यक्षस्थान रावबहाद्दूर अ. मुधोळकरांच्या पत्नी राधाबाई यांनी भुषविले. अमरावतीनंतर यवतमाळच्या स्त्रियांनी 1901 मध्ये महिला समाजाची स्थापना केली. या समाजाचा मुख्य हेतू स्त्री वर्गात ज्ञानाचा प्रसार करणे हा होता. ही सभा स्थापन करण्यामध्ये सिताबाई लांडगे, व रखमाबाई भट यांचा पुढाकार होता.

स्त्री वर्गात ज्ञानाचा प्रसार व्हावा, याच हेतूने 1905 मध्ये हैद्राबाद येथे अबलोन्नती महिला समाजाची स्थापना केली गेली. आगरकरांची मामे बहीण मनुताई बापट यांनी लेडिज होम क्लासची स्थापना 1911 मध्ये अकोला येथे केली होती. सोलापूर मध्ये जैन समाजाचे श्राविकाश्रम 1912 मध्ये स्थापन झाले. [51] अशा संस्थाचे कार्य स्थानिक पातळीवर मर्यादीत होते त्यामुळे त्यांचा विस्तारही मर्यादीत होता. अशा प्रकारच्या स्त्री सभांची सुरुवात त्या काळात झालेली दिसून येते.

**नाटकांच्या माध्यमातून बदलते स्त्री जीवन :-**

इ.स. 1843 ते 1920 या काळात सामाजिक नाटकांची निर्मिती झाली. त्यातील रंगभूमीवर आलेले सर्वप्रथम नाटक म्हणजे, ' सिता स्वयंवर' ( 1843). या काळातील शिक्षण विषयक नाटकामध्ये स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे व विरोध करणारे अशा दोन्ही स्वरुपाची नाटके लिहिली गेली.

सामाजिक नाटकातून विषय मांडत असताना सुशिक्षित स्त्रियांची आणि सुधारकांची अतिरंजित चित्रणे दर्शविली गेली. ' तरुणी शिक्षण नाटीका ' ( ना.बा. कानिटकर - 1886) आणि स्त्रीविद्यावैचित्र्यदर्शन समाजातील सहानूभुतोशुन्यतेमुळे विधवांची होणारी दुर्दशा, त्यांच्या हातून होणारे अनर्थ दर्शवून ' मनोरमा' (1871) मधून म.बा.चितळे यांनी पुनर्विवाहाची आवश्यकता सांगितली आहे. ' स्वैरसकेशा' ( 1871 ) या रघुनाथ अभ्यंकर यांच्या नाटकाची नायिका ही बालविधवा आहे. केशवपन करत नाही, म्हणून समाजाचा तिच्यावर राग आहे. सामाजिक रुढी परंपराना कंटाळून आपल्या प्रियकराचे प्रेम आपण लग्न करुन सिध्द करु शकत नाही म्हणून शेवटी ती आत्महत्त्या करते. हे नाटक कन्या विक्रय आणि बालाजरठ विवाहाचे दुष्परिणाम दाखविण्यासाठी लिहलेले जाणवते. ' सौभाग्य रमा' (1884) या नाटकात विधवांची करुण स्थिती दाखवून तिचा पुनर्विवाह दर्शविला आहे. असे विधवा विवाह दर्शविणारे हे पहिलेच नाटक असल्याने तत्कालीन समाजाला ते रुचणारे नव्हते.

इ.स. 1856 मध्ये पुनर्विवाह कायदा पास झाला तरी समाजाचे मत परिवर्तन मात्र झालेले नव्हते. त्यासाठी समाज प्रबोधनाचे माध्यम म्हणून नाटकांचा आधार घेतला जात होता. पुनर्विवाहाच्या प्रश्नावरुन 1870 मध्ये शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखाली वाद झाला. त्यात दुर्दैवाने सुधारक पक्षाची हार झाली. हे शतक संपेपर्यंत पुनर्विवाह सुधारणा आमंलात आणले गेले नाही तरीही इ.स. 1800 ते 1900 या कालखंडात महाराष्ट्रात 39 पुनर्विवाहांची नोंद आढळते. विधवांच्या दु:खाचे समर्थन मान्य करण्यास समाजास बराच काळ घालवावा

लागला. विधवा विषयी होणारे अनुकूल - प्रतिकूल लेखन, वादविवाद, चर्चा यामुळे विधवा विवाहाचा उच्चार मात्र समाजात वर्ज्य राहीला नाही. बालाजरठ विवाह हे स्त्री वैधव्याचे कारण असल्याने बालाजरठ विवाहाचा निषेध व विधवा विवाहाचा पुरस्कार या दोन्ही गोष्टी सामाजिक चळवळीच्या अग्रभागी होत्या. [52] एकूणच सामाजिक नाटकांच्या माध्यमातून समाज प्रबोधन घडवून आणण्याचा, स्त्री विषयक समस्या हाताळण्याचा प्रयत्न करुन समाजातील स्त्री विषयक विचारांचे मत परिवर्तन करण्याचे विधायक कार्य झालेले आढळते.

1812 नंतर महाराष्ट्रात ब्रिटीशांचे राज्य आले. तेव्हा ख्रिस्ती धर्म प्रसारकही मोठ्या प्रमाणात आले. त्यांनी धर्म प्रसार व सामाजिक कार्य सुरु केले. 1818 मध्ये दुस-या बाजीराव पेशव्यांचा पराभव झाल्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीचे महाराष्ट्रातील वर्चस्व वाढले. ब्रिटीशांनी सुरुवातीला कोणत्याही सामाजिक पंरपरेला महाराष्ट्रात विरोध केला नव्हता. किंवा त्यात हस्तक्षेपही केला नव्हता. मात्र त्यांनी आपल्या धोरणात 1830 पासून बदल करण्यास सुरुवात केली.

1828 ते 1856 च्या दरम्यान सामाजिक परंपरेत कंपनीच्या प्रतिनिधीनी हस्तक्षेपाला सुरुवात केल्याचे आढळते. योग्य असे कायदे कानून करुन वाईट अशा सामाजिक रुढीवर निर्बंध घालण्याचा प्रयत्न केला. वाईट प्रथा नष्ट करणे हे पवित्र कार्य आहे असे कित्येक इंग्रज अधिका-यांना वाटत असे. लॉर्ड विल्यम बेंटीक ( गव्हर्नर जनरल 1828 - 35) ने सामाजिक सुधारणांना प्रोत्साहन दिले. सती प्रथेवर 1829 मध्ये बंदी आणली. लॉर्ड डलहौसीने (गव्हर्नर जनरल 1848 - 56) विधवा विवाहाचा कायदा आणला. महाराष्ट्रात ब्रिटीशांनी समाज सुधारणांना सुरुवात केली. तरी येथील समाज सुधारकांनीही प्रथम लेखनीच्या माध्यमातून स्त्री सुधारणाविषयक अनूकुल मत समाजात निर्माण करण्याचे प्रयत्न केले. लोकहितवादींनी शतपत्रातून स्त्री विषयक विविध प्रश्नांना चालना दिली. बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' व ' प्रभाकर' मधून विधवा पुनर्विवाहावरील लेख व वृत्तांत प्रसिध्द केले. तर विष्णुशास्त्री पंडितानी विधवा विवाहाच्या समर्थनावर लेख लिहीले. बालविवाह,

अनेक वा बहुपत्नी विवाह या रुढींमुळे वैधव्य पदरी पडलल्या स्त्रियांची संख्याही मोठ्या प्रमाणात होती. सुधारकांनी याकडेही लक्ष वळविले. केसरी, मराठा, शतपत्रे यातून यावरही लेख लिहीले. 1885 च्या दरम्यान बेहरामजी मलबारी यांनी बालविवाह व सक्तीचे वैधव्य या विषयावर लेख प्रसिध्द केला. [53]

अशाप्रकारच्या अनेक नियतकालिकातून व वृत्तपत्रातून स्त्री सुधारणा विषयक परिस्थिती निर्माण होत होती असे वाटते. 19 व्या शतकात घडणा-या सत्तातंराच्या घटनेचा परिणाम स्त्री जीवनावरही झाला. स्त्री सुधारणेचे महत्वाचे असे दोन टप्पे आढळतात. ते म्हणजे 1850 ते 1880 आणि 1880 ते 1920 होय. 1850 ते 1880 च्या कालखंडात स्त्री विषयक जाणिवा निर्माण झालेल्या आहेत. नव्या जुन्या विचारांच्या संघर्षाचा हा टप्पा आहे. लोकहितवादी, न्या. रानडे, आगरकर, इ. सुधारक स्त्रीसुधारणांचा पुरस्कार करत होते. म. फुल्यांनी स्त्री शिक्षणाचे पवित्र कार्य हाती घेतले होते. अनेक सुशिक्षित तरुणांनी आपल्या पत्नीस घरीच शिकविण्याचे कार्य केले. या टप्प्यात स्त्री शिक्षणाचा प्रसार होवून स्त्रिया शिक्षणासाठी पुढे येत होत्या.

1880 ते 1920 या काळात स्त्रियांची विशेष प्रगती झाली. स्त्रियांकडूनच स्त्रीसुधारंणेच्या कार्याला प्रथम सुरुवात झाली. रमाबाई रानडे, काशिबाई कानिटकर यांनी ' हायस्कूल फ़ॉर इंडियन गर्ल्स' सुरु केले. पंडिता रमाबाईनी शारदासदन उभे केले. आण्णासाहेब कर्वेनी हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेची स्थापना केली. स्त्रिया संघटीत होण्याच्या दृष्टिकोनातून 1904 मध्ये अखील भारतीय महिला परिषदेचे आयोजन रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. डॉ. आनंदीबाई जोशी यांनी अमेरिकेत जाऊन वैद्यकीय शिक्षण घेतल्याने त्याचाही परिणाम मोठ्या प्रमाणात झाला. स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजला सुरुवात झाली. दिल्लीला स्वतंत्रपणे स्त्रियांसाठी मेडीकल कॉलेज सुरु झाले. म. कर्वे यांनी महिला विद्यापीठ स्थापन केले. अशा सामाजिक स्त्री सुधारणा बरोबरच स्त्रियांनी आपली बौध्दिक क्षमताही सिध्द केली होती. शिवाय 1920 पूर्वीच डॉ. ॲनी बेझंट यांचे भारतात आगमन

झाल्यामुळे स्त्रियांचा सक्रिय राजकारणात सहभाग व्हावा यासाठीहं चालना मिळाली. तसेच स्त्रियांचे राजकिय विश्वात पदार्पण होण्यास अत्यल्प प्रमाणात का होईना पण सुरुवात झाली.

## संदर्भ सूची


1) बेडेकर दि. के., भनगे भा.शं. (संपा) - भारतीय प्रबोधन : समीक्षण व चिकित्सा , समाज प्रबोधन संस्था, पुणे प्रथमावृत्ती जुलै - 1973, पृष्ठ. क्र. 258

2) नंदा बी. आर(संपा) - इंडियन वुमेन :फ्रॉम परदा टू मॉडर्निटी , न्यू देहली : विकास 1976

3) चौधरी मैत्रेयी - इंडियन वुमेन्स मुहमेंट रिफॉर्म ॲन्ड रिव्हावाव्हल , न्यू देहली , फर्स्ट पब्लीशड 1993 पृष्ठ क्र. 18

4) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 19

5) भागवत विद्युत , जोशी ललिता : (मराठी अनुवाद) - जिजीवीषा स्त्रियांच्या कर्तेपणाचा इतिहास : एकोणिसावे शतक, स्त्री अभ्यास केद्रं समाज शास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, मार्च1996 पृष्ठ. क्र.5

6) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 5 व 6

7) कित्ता -उपरोक्त पृष्ठ. क्र. 9 व 10

8) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 13

9) कित्ता - उपरोक्त पृ्ठ. क्र. 15

10) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 20

11) सेन एस . पी. (संपा) - सोशल ॲन्ड रिलिजिअस रिफॉर्म मुव्हमेंट

इन द नाईट्निथ सेंच्युरी ॲन्ड व्टेन्टिंथ सेंच्युरी, इन्सटीट्युट ऑफ हिस्टॉरिकल स्टडीज , कलकत्ता, फर्स्ट पब्लीशड1979 पृष्ठ. क्र. 71

12) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 92

13) कित्ता - उपरोकत पृष्ठ. क्र. ८6

14) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 348, 349

15) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 325

16) फडके य.दि. - वुमेन इन महाराष्ट्र, महाराष्ट्र इन्फॉरमेशन सेंटर, गर्व्हमेंट ऑफ महाराष्ट्र, न्यू दिल्ली 1989 पृष्ठ क्र 02

17) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 2

18) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 6

19) प्रियोळकर अ.का. ( संपादक ) - लोकहितवादी कृत निंबध संग्रह, पॉप्युलर प्रकाशन, मुबंई, व्दितीयावृत्ती 1967, पृष्ठ. क्र. 97

20) रानडे प्रतिभा - स्त्री प्रश्नांची चर्चा, पद्मगंधा प्रकाशन पुणे, मार्च 2005 पृष्ठ. क्र 316 ते 326

21) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र 372

22) पाटील शोभा - स्त्रियांची आत्मचरित्रे : स्त्रीवादी शोध, मल्हार प्रकाशन पुणे., प्रथमावृत्ती 2002, पृष्ठ. क्र 57 ते 61

23) इंगोले कृ.जी. - मराठी साहित्यातील विधवा जीवनाचे दर्शन (इ.स. 1818 ते 1920 ) ,

शिवाजी विद्यापीठास पीएच.डी साठी सादर केलेला अप्रकाशित शोध प्रबंध, ऑगस्ट 1981, पृष्ठ. क्र 80

24) सहस्त्रबुध्दे पु.ग. ( संपादक ) - लोकहितवादीची शतपत्रे, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे, पाचवी आवृत्ती, 1970, पत्र क्र. 30 पृष्ठ. क्र 229

25) व्होरा राजेंद्र ( संपादक ) - आधुनिकता आणि परंपरा : एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, नोव्हे. 2000, पृष्ठ. क्र. 243

26) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र 244

27) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र 244, 245

28) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र 249

29) भागवत विद्युत - महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने....., स्त्री अभ्यास केंद्र समाज शास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ पुणे, पृष्ठ. क्र. 17 ते 20

30) पदमनजी बाबा - यमुना पर्यटन, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे पाचवी आवृती, 1974

31) सहस्त्रबुध्दे पु.ग. - केसरीची त्रिमूर्ती, केसरी प्रकाशन पुणे1974, पहिली आवृत्ती, पृष्ठ. क्र. 172

32) पाटील विमल के. - मराठी सामाजिक नाटाकांनी मांडलेले स्त्रियांचे प्रश्न (इ.स. 1857 ते 1920), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या पीएच.डी

(मराठी )पदवीसाठी सादर केलेले अप्रकाशित शोध प्रबंध ऑक्टोबर 1989, पृष्ठ. क्र. 169 ते 174.

33) भागवत विद्युत, जोशी ललिता ( मराठी अनुवाद ) - उपरोक्त पृष्ठ. क्र. 13 ते 16

34) प्रधान ग. प्र. ( संपादक ) - आगरकर लेख संग्रह, साहित्य आकादमी नवी दिल्ली, प्रथमावृत्ती 1960, पृष्ठ.क्र 94.

35) देशपांडे सुनंदा - गो.ग. आगरकर, श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 1983 पृष्ठ. क्र. 151

36) कर्वे आनंदीबाई - माझे पुराण केशव भिकाजी ढवळे प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती 1944,

37) सहस्त्रबुध्दे द.ल., पंडित श्री.स - विष्णुपरशुराम पंडित यांचे चरित्र, पुणे, 1935, पृष्ठ. क्र. 21

38) इंगोले कृ.जी. - उपरोक्त पृष्ठ. क्र 192

39) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 193

40) मालशे स.ग.,आपटे नंदा - विधवा विवाह चळवळ, श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई,पृष्ठ.क्र 88

41) किर धनंजय - महात्मा जोतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, आवृत्ती - 2, 1975 पृष्ठ. क्र. 293

42) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 293 , 294

43) ढेरे अरुणा - विस्मृतीचित्रे, श्रीविद्या प्रकाशन पुणे, व्दितीय आवृत्ती 2001 , पृष्ठ. क्र. 7 व 8

44) कित्ता - उपरोक्त पृष्ठ. क्र. 10

| | | |
|---|---|---|
| 45) | भागवत विद्युत | - उपरोक्त पृष्ठ. क्र. 37 |
| 46) | कर्वे स्वाती | - स्त्री विकासाच्या पाऊल खुणा, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 2003, पृष्ठ. क्र. 68 ते 70 |
| 47) | ढेरे अरुणा | - उपरोक्त पृष्ठ. क्र. 25 |
| 48) | कित्ता | - उपरोक्त पृष्ठ. क्र. 30 व 31 |
| 49) | पानसे वेणुबाई | - प्रगती पथावर : हायस्कूल फ़ॉर इंडियन गर्ल्स, हुजूर पागा, सुवर्ण महोत्सव स्मारक ग्रंथ, पुणे 1934, पृष्ठ. क्र.18 |
| 50) | विध्वांस माधव श्रीनिवास | - श्रीमती रमाबाई रानडे : व्यक्ती आणि कार्य, मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई 1989, पृष्ठ. क्र. 121 ते 155 |
| 51) | बाबर सरोजिनी | - स्त्री शिक्षणाची वाटचाल महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालय, मुंबई 1968, पृष्ठ. क्र. 162 ते 168 |
| 52) | अपसिंगेकर रजनी अनिल | - बदलते स्त्री जीवन आणि नाटक ( इ.स. 1843 ते 1947), मुबंई विद्यापीठ मुबंईच्या पीएच. डी. (मराठी) पदवी साठी सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, जुलै 2005, पृष्ठ. क्र. 175. |
| 53) | पाटील शोभा | - उपरोक्त पृष्ठ. क्र. 59 |